(कार्यालयीन उपयोगाकरीता फक्त)

सत्यमेव जयते

# एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम

# मार्गदर्शक सूचना



**महाराष्ट्र शासन**

**२००९**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | बाब | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १-२ |
| २ | सामाईक मार्गदर्शक सूचना व इतर योजनांमधील समायिक बाबी | ३ |
| ३ | सामाईक मार्गदर्शक सूचना व इतर योजनांमधील तुलनात्मक बाबी | ४-६ |
| ४ | प्रकल्पाची उदिष्टये | ७ |
| ५ | राष्ट्रीय पर्जन्याधारीत क्षेत्र प्राधिकरणाचे कार्य | ८ |
| ६ | मंत्रालयीन स्तरावरील संस्थात्मक रचना | ८ |
| ७ | राष्ट्रीय स्तरावरील माहिती केंद्र आणि राष्ट्रीय पोर्टल | ८ |
| ८ | **राज्यस्तरावरील संस्थात्मक व्यवस्था** | |
| ९ | राज्य स्तरीय नोडल यंत्रणा **(SLNA)** | १०-१३ |
| १० | जिल्हा पाणलोट क्षेत्र विकास युनिट **(DWDU)** | १३-१५ |
| ११ | पंचायत राज संस्थेची  जिल्हा आणि मध्यम स्तरावरील भुमिका | १५ |
| | **प्रकल्प स्तरावरील संस्थात्मक व्यवस्था** | |
| १२ | प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण (यंत्रणा) **(PIA)** | १६-१८ |
| १३ | प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाची भुमिका व जबाबदा-या | |
| १४ | पाणलोट विकास पथक **(WDT)** | १९-२१ |
| १५ | पाणलोट क्षेत्र विकास पथकाची कार्ये व जबाबदा-या | |
| | **ग्रावस्तरावरील संस्थात्मक रचना व लोकसहभाग** | |
| १६ | स्वयंसहाय्य गट **(SHGs)** | २१ |
| १७ | उपभोक्ता गट **(UGs)** | २१ |
| १३ | पाणलोट समिती **(WC)** | २२-२३ |
| १४ | सचिव - पाणलोट समिती | २४-२५ |
| १५ | ग्रामपंचायतीची भूमिका | २६ |
| १६ | पाणलोट प्रकल्पांच्या निवडीकरिता निकष | |
| १७ | प्रकल्प व्यवस्थापन | २७ |
| १८ | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन | २७ |
| १८ | पूर्व तयारीचा टप्पा | २७-३७ |
| १९ | पाणलोट क्षेत्र कामाचा टप्पा | ३७-४१ |
| २० | एकत्रिकरण व प्रत्यावर्तन टप्पा | ४१-४३ |
| २१ | उपभोक्ता वर्गणी | ४३ |
| २२ | पाणलोट विकास निधी **(WDF)** | ४३-४४ |
| २३ | पाणलोट विकास कार्यक्रमास मान्यता व मंजूरी | ४४-४५ |
| २४ | पाणलोट प्रकल्पातील विविध घटकांकरिता तरतूदीचे वाटप | ४६-४७ |
| २५ | केंद्र शासनाकडून निधी वितरण कार्यपध्दती | ४६ |
| २६ | प्रकल्प मध्येच बद करणे | ४७ |
| २७ | क्षमता बांधणी | ४८ |
| २८ | सनियंत्रण | ४८ |
| २९ | मूल्यमापन | ५१ |
| ३० | निष्कर्ष/परिणाम | ५१ |


www.mahaagri.gov.in

# एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना

**प्रस्तावना :**

अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (DPAP) आणि वाळवंट विकास योजना (DDP) या योजनांमधील त्रुटी दूर करण्यासाठी व योजनेत सुधारणा सुचविण्यासाठी सन १९९४ मध्ये प्रा. सी. एच. हनुमंता राव यांच्या अध्यक्षतेखाली तंत्र समिती नेमण्यात आली होती. "वेगवेगळया विभागांनी साचेबंद मार्गदर्शक तत्वांनुसार वेगवेगळया पध्दतीने योजनांची अंमलबजावणी केली. कार्यक्रम राबविताना रहिवाशांचा सहभाग नव्हता त्यामुळे काही ठिकाणी प्रकल्पाचे उद्दिष्ट काही प्रमाणात पूर्ण झाले तसेच जमिनीची धूप थांबविणे काही प्रमाणात यशस्वी झाले. तसेच भूपृष्टावरील वनाचे आच्छादन कमी झाल्यामुळे पाण्याची पातळी कमी झाली, त्यामुळे पिण्याचे पाणी, इंधन व जनावरांसाठी चारा यांमध्ये कमतरता निर्माण झाली." (हनुमंता राव समिती, १९९४ प्रस्तावना)

या पार्श्वभूमीवर वाळवंट विकास कार्यक्रम, अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम आणि एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम (IWDP) एकाच छताखाली आणण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या. भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण आणि एकत्र गुंतवणूक करण्यासाठी केंद्राभिमुख करण्यांसाठी नावीन्यपुर्ण मार्गदर्शक सुचनांची आवश्यकता होती. ११ व्या योजनेच्या प्रारंभी, राष्ट्राला "सर्वकष वृध्दी" च्या दिशेने नेणे हे मुख्य आव्हान आहे. पर्जन्याधारित क्षेत्रांतील लोकांची गरीबीची बिकट स्थिती, पाण्याचे दूर्भिक्ष्य, भूजलामध्ये जलद गतीने होणारी घट आणि असंतुलीत पर्यावरण , वारा व पाणी यामुळे होणारी जमिनीची धूप व त्यामुळे होणारी जमिनीची अवनती, पावसाच्या पाण्याचा कमी कार्यक्षमतेने वापर होणे, जास्त लोकसंख्येचा दबाव, गंभीर चारा टंचाई, पशुधनापासून मिळणारे अपुरे उत्पादन, पाण्याच्या कार्यक्षम वापरामधील कमी गुंतवणूक, शाश्वत व लाभकारी बाजारपेठेच्या संधीचा अभाव आणि पायाभूत सुविधांची कमतरता या महत्वाच्या बाबी आहेत.

म्हणून, लोकसहभागातून पाणलोट क्षेत्र विकास करून त्याद्वारे उत्पन्न, व उत्पादकता वाढवण्याकरिता आणि शाश्वत पध्दतीने उपजीविकेची सुरक्षितता यांकरिता एकात्मीक शेती पध्दतीवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण जीवनमान उंचावणे करिता पर्जन्याधारित क्षेत्रांवर विशेष भर देण्याची गरज लक्षात घेवून माहे नोव्हेंबर २००६ मध्ये राष्ट्रीय पर्जन्याधारित क्षेत्र प्राधिकरणाची (NRAA) स्थापना करण्यात आली. या संदर्भात, नियोजन आयोगाच्या समन्वयनाने, सर्व केंद्रिय मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणा-या योजनासाठी "सामाईक मार्गदर्शक सूचना" तयार करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

देशाच्या एकूण ३२९ दशलक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी जवळपास १४६ दशलक्ष हेक्टर इतके क्षेत्र अवनत प्रकारचे आहे. आणि ८५ दशलक्ष हेक्टर क्षेत्र हे पर्जन्याधारित कृषियोग्य जमीन आहे. राज्यामध्ये ३०७ लक्ष हे भौगोलिक क्षेत्रापैकी ४२.२० टक्के इतके क्षेत्र अवनत प्रकारचे आहे. तर १५९ लक्ष हेक्टर क्षेत्र ( ५२ टक्के) हे अवर्षण प्रवण क्षेत्रात येत आहेत. तसेच हलक्या जमिनीचे प्रमाण ३९ टक्के आहे. तसेच संपुर्ण सिंचन क्षमता

www.mahaagri.gov.in

उपयोगात आणली तरीही ७० टक्के क्षेत्र हे कोरडवाहुच राहणार असल्यामुळे राज्याच्या दृष्टीने पाणलोट विकास कार्यक्रमास अनन्यसाधारण महत्व आहे.

१ एप्रिल, २००८ पासून सामाईक मार्गदर्शक सूचनां भारत सरकारच्या सर्व विभागांच्या पाणलोट क्षेत्र विकासाशी संबंधित सर्व योजनांना लागू केल्या आहेत. त्यानुसार केंद्र शासनाच्या भुसंसाधन विभागामार्फत पाणलोट विकासाशी संबंधीत ‘ एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम २००९ पासुन राबविणेत येत आहे. यापूर्वी मंजूर केलेले आणि सुरू असलेले प्रकल्प जुन्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे राबविणेत येणार आहेत.

या मार्गदर्शक सुचनामध्ये खालीलप्रमाणे नाविन्यपुर्ण बाबी आहेत.

- पाणलोट प्रकल्पाची अंमलबाजावणी लोकसहभागातुन केली जाणार, यामध्ये प्रकल्पाचे नियोजन, क्षमता, बांधणी, अंमलबजावणी, प्रशिक्षण व सामाजिक अंकेक्षण हे महत्वाचे घटक असुन त्यासाठी लोकांना वेगवेगळया टप्प्यावर प्रशिक्षण देवुन त्यांचे कौशल्य वाढविण्यात येणार आहे.
- पाणलोटातील शेतीची उत्पाकता वाढविणेबरोबरच उत्पन्न वाढविणेसाठी शेतकरी ,शेतमजुर व भुमिहीनांसाठी उदरनिर्वाहाची साधने तयार करणेसाठी वेगवेगळया उपाययोजनांची तरतुद करणेत आली आहे.
- या योजनेतंर्गत उपभोक्ता गट, स्वंयसहाय्यता गट , महिलांचे गट व तरुणाचे गट तयार करुन उपजिविकेच्या संधी उपलब्ध करुन देऊन उत्पादकतेत वाढ करणेत येणार.
- प्रकल्प अंमलबजावणी नंतर सामाजिक अंकेक्षण अनिवार्य (Social Audit)

www.mahaagri.gov.in

## सामाईक मार्गदर्शक सुचना व इतर योजनामधील समाईक बाबी

| अ.क्र | बाब | कृषि मंत्रालय | ग्रामिण विकास मंत्रालय | पर्यावरण व वन मंत्रालय | सामाईक मार्गदर्शक सुचना २००८ |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यक्रम / योजना | रापाविका व इतर | डोंगरी विकास, अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, एकात्मिक पडिक जमिन विकास कार्यक्रम | नॅशनल अफॉरेस्टेशन प्रोग्रॅम (एन ए पी ) | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम |
| २ | पाणलोट दृष्टीकोन | होय | होय | होय | होय |
| ३ | संस्था | १. प्रकार्य २.पाणलोट संघ/पाणलोट समिती | १. प्रकार्य २.पाणलोट संघ/पाणलोट समिती | १.सयुक्त वन व्यवस्थापन समिती २.वन विकास समिती | १. प्रकार्य २.पाणलोट समिती |
| ४ | सोसायटी ॲक्ट खाली नोंदणी | होय | होय | होय ( सयुक्त वन व्यवस्थापन समिती सोडुन) | होय |
| ५ | सर्व प्रौढ व्यक्ती पाणलोट संघाच्या सर्वसाधारण बॉडीच्या सदृस्य | होय | होय | होय | - |
| ६ | सयुक्त खाते | होय (पाणलोट समिती अध्यक्ष, पाणलोट विकास पथक सदस्य व सचिव यांचे नावे) | होय (पाणलोट समिती अध्यक्ष, पाणलोट विकास पथक सदस्य व सचिव यांचे नावे) | होय (सयुक्त वन व्यवस्थापन समिती अध्यक्ष, पाणलोट विकास पथक सदस्य व सचिव यांचे नावे | होय (पाणलोट समिती अध्यक्ष, पाणलोट विकास पथक सदस्य व सचिव यांचे नावे |
| ७ | प्रशासकिय खर्चाची तरतुद टक्के | १० | १० | १० | १० |
| ८ | लोक वर्गणी/ श्रमदान | कॉर्पस निधी २ टक्के | पाणलोट विकास निधी | वन विकास निधी | पाणलोट विकास निधी |

www.mahaagri.gov.in

## सामाईक मार्गदर्शक सुचना व इतर योजनामधील तुलनात्मक बाबी

| अ.क्र. | बाब | हरियाली मार्गदर्शक सूचना २००३ | रापाविका २००० | सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ |
|---|---|---|---|---|
| १ | **कार्यक्रम** | ३ कार्यक्रम<br>१.एकात्मिक पडीक जमिन कार्यक्रम<br>२.अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम<br>३.डोंगरी विकास कार्यक्रम | राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम | एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रम |
| २ | प्रकल्पाचे क्षेत्र | एक सूक्ष्म पाणलोट (सरासरी ५०० हे.) | एक सूक्ष्म पाणलोट (सरासरी ५०० हे.) | मेगा पाणलोटातील सूक्ष्म पाणलोटांचा एक समूह (१००० ते ५००० हे.क्षेत्र) |
| ३ | पाणलोटाची निवड | खात्रीशीर बागायती क्षेत्राचा समावेश आहे | खात्रीशीर बागायती क्षेत्राचा समावेश आहे | प्रकल्पातून खात्रीशीर बागायती क्षेत्र, राखिव वनाचे क्षेत्र, उद्योगासाठीचे क्षेत्र व अकृषक जमीनीखालील क्षेत्र वगळले आहे. |
| ४ | प्रति हे.खर्च | रु.६०००/- | रु.६०००/- | रु.१२०००-१५००० |
| ५ | निधीचे वाटप | प्रशिक्षण व समूह संघटन ५ % | प्रशिक्षण ५ % | प्रशिक्षण ५% |
| | | प्रशासन १० % | प्रशासन १० % | प्रशासकीय १०% |
| | | कामे ८५ % | कामे ७७.५ % | सनियंत्रण व मूल्यमापन २% |
| | | | | कामे ७८% |
| | | | | एकत्रिकरण ५% |
| ६ | प्रकल्प कालावधी | ५ वर्षे | ५ वर्षे | ४ ते ७ वर्षे |
| ७ | निधी उपलब्ध होणेचे हप्ते | पांच (१५%,३०%,३०%, १५% व १०%) | ५ टप्पे (१०%,२०%,२७.३ %, २१.२%, २१.५% ) | तीन टप्पे (२०% ,५०% ,३०%) |
| ८ | संस्थात्मक आधार | कमजोर संस्थात्मक आधार | वेगळी तरतूद नाही. आस्तित्वात असलेल्या संस्थाकडून अंमलबजावणी | १.राष्ट्रीय स्तर - राष्ट्रिय पर्जन्याधारित क्षेत्र प्राधिकरण<br>२)राज्यस्तर - वसुंधरा राज्यस्तरिय पाणलोट विकास यंत्रणा,<br>३)जिल्हा स्तर - जिल्हा पाणलोट विकास युनिट<br>४)प्रकल्प स्तर- प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा आणि<br>५) ग्राम स्तर - पाणलोट समिती |

www.mahaagri.gov.in

| अ.क्र. | बाब | हरियाली मार्गदर्शक सूचना २००३ | रापाविका २००० | सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ |
|---|---|---|---|---|
| ९ | राज्याची भूमिका | राज्याची भूमिका, पर्यवेक्षीय सल्लागार, आर्थिक आधार नसलेली | राज्याची भूमिका, पर्यवेक्षीय सल्लागार, आर्थिक आधार नसलेली | प्रकल्पांना मंजूरी देण्याचा अधिकार आणि निधीचा आधार, संनियंत्रण |
| १० | प्रकल्प स्तरावर प्रकार्य | सलंग्न विभाग/स्वायत्त संस्था/पंचायत राज संस्था | सलंग्न विभाग/स्वायत्त संस्था | कृषि विभाग/ वन विभाग/ सामाजिक वनिकरण/ भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा /इतर संलग्न शासकीय विभाग/ |
| ११ | गावपातळीवर प्रकार्य | ग्रामपंचायत | पाणलोट समिती | पाणलोट समिती |
| १२ | प्रशिक्षणासाठी तरतुद | प्रकल्प खर्चाच्या २.५ % | प्रकल्प खर्चाच्या ५% | प्रकल्प खर्चाच्या ५% |
| १३ | नियोजन व सविस्तर प्रकल्प तयार करणे | स्वतंत्र घटक नाही. | स्वतंत्र घटक नाही | शास्त्रोक्तदृष्टया सविस्तर प्रकल्प अहवाल लोकसहभागातुन, लोकांच्या संमतीने ,PRA करुन तयार करणेसाठी प्रकल्प खर्चाच्या १ % तरतूद. सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रकल्प कार्यान्वन यंत्रणा तयार करेल. |
| १४ | कामाची अंमलबजावणी<br>१.कामे<br>२. प्रशिक्षण<br>३. भुमिहीनासाठी व शेतक-यासाठीची कामे | स्वतंत्र घटक नाही. | स्वतंत्र घटक नाही. | १.कामाची अंमलबजावणी- उपभोक्ता गटाच्या माध्यमातुन पाणलोट समिती करेल<br>२. प्रशिक्षण – पाणलोटातील वेगवेगळ्या घटकासाठी प्रशिक्षण देणेचे काम यशदा/राज्य प्रशिक्षण संस्था/जिल्हा प्रशिक्षण संस्था करतील<br>३. इतर कामाची अंमलबजावणी उपभोक्ता गट व स्वयंसहाय्यता गटाच्या मध्यमातुन करणेत येणार. |
| १५ | संनियंत्रण व मूल्यमापन | स्वतंत्र घटक नाही.<br>१) प्रकल्प मध्ये मूल्यांकन<br>२) अंतिम मूल्यांकन | समवर्ती आणि अंतिम मूल्यमापन स्वतंत्र घटक नाही | अ. संनियत्रण -<br>१.प्रकल्प गटांकडून (प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण (PIA) /जिल्हा पाणलोट क्षेत्र विकास युनिट) (DWDU) अंतर्गत संनियंत्रण<br>२. प्रगती संनियंत्रण<br>३. भौगोलिक माहिती प्रणाली (GIS)/वेबआधारित ऑन-लाईन संनियंत्रण<br>४.समूहाकडून स्वयंसंनियंत्रण |

www.mahaagri.gov.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ५.शाश्वततेसाठी संनियंत्रण<br>६.सामाजिक लेखा परिक्षण<br>७. त्रयस्थ यंत्रणाकडून स्वतंत्र व बाहय संनियंत्रण<br>८. प्रक्रिया संनियंत्रण<br>यासाठी प्रकल्प खर्चाच्या १% तरतूद.<br>ब. मुल्यमापन –<br>समवर्ती व प्रकल्प पश्चात मूल्यमापन राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा व राष्ट्रीय स्तरावरील निवडलेल्या संस्थाच्या पॅनल कडुन करणेत येणार यासाठी प्रकल्प खर्चाच्या १% तरतूद. |
| १६ | शाश्वतता | कमजोर व्यवस्था<br>पाणलोट विकास निधीचा साधन म्हणून वापर | कमजोर व्यवस्था<br>पाणलोट विकास निधीचा साधन म्हणून वापर | पाणलोट विकास निधीसह एकत्रिकरण टप्पा आणि उदरनिर्वाह घटक व उपभोक्ता गटामार्फत कामाची देखभाल. |
| १७ | प्रकल्प मध्येच बंद करणे | तरतूद नाही | तरतूद नाही | प्रकल्प मध्येच बंद करणेची तरतूद आहे. |
| १८ | केंद्र/राज्य हिस्सा | ७५:२५ - अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, डोंगर विकास कार्यक्रम<br>११:१-एकात्मिक पडीक जमिन विकास | १०० टक्के | ९०:१०<br>एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम |

www.mahaagri.gov.in

## प्रकल्पाची उदिष्टे :-

१. पाणलोट क्षेत्र विकासाच्या सर्वमान्य उद्दीष्टांसोबत पाणलोट विकासाच्या माध्यमातून निर्माण होणा-या कृषि आधारीत स्वयंरोजगाराच्या संधीव्दारे समाज घटकांची आर्थिक उन्नती साधणे.

२. ग्रामसभेच्या सहभागातून, लोक सहभागातून व संमतीने स्थानिक परिस्थिती व नैसर्गिक व उपलब्ध पायाभूत संसाधनांचा विचार करुन प्रकल्प नियोजन करणे. मृद व जलसंधारण (In situ व ex situ) या पध्दतीने कामासोबतच संसधान आधारीत स्वयंरोजगाराचे दीर्घकालीन नियोजन करणे.

३. पाणलोट विकास कार्यक्रमाबरोबरच पाणलोट क्षेत्रातील शेतक-यांसाठी, भुमिहिन , शेतमजुर , महिला यांचेसाठी उदरनिर्वाहाची साधने निर्माण करणेसाठी नियोजन व त्याची अंमलबजावणी करणे.

४. पाण्याच्या ताळेबंदाविषयी जनजागृती व सक्षमतेने पाणी वापर या संदर्भात प्रबोधन करणे.

५. दिर्घकालीन शाश्वत रोजगार निर्मितीवर भर देणे, व कृषि आधारीत अर्थव्यवस्था बळकट करणे. तसेच वेगवेगळ्या शेती पध्दती उदा. कृषि + पशुधन विकास, कृषि + फलोत्पादन विकास, कृषि + दुग्ध व्यवसाय इ. ची अंमलबजावणी करणे

६. दिर्घकालीन शाश्वत देखभाल दुरुस्ती कायमस्वरुपी सहभागी पध्दतीने करण्यासाठी पाणलोट देखभाल निधी उभारणे.

www.mahaagri.gov.in

## राष्ट्रीयस्तरावरील संस्थात्मक व्यवस्था :

### अ.राष्ट्रीय पर्जन्याधारित क्षेत्र प्राधिकरण (NRAA)

मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करून पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांच्या परिणामकारक व व्यावसायिक व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय पर्जन्याधारित क्षेत्र प्राधिकरण (NRAA) ची स्थापना खालील उद्देशासाठी करणेत आली आहे.

१. कृषि- हवामानविषयक व सामाजिक-आर्थिक स्थिती लक्षात घेऊन, राज्य व जिल्हा स्तरावर पाणलोट आधारित प्रकल्पांकरिता धोरणात्मक योजना तयार करण्यासाठी राज्यांना मदत करणे.

२. प्रकल्पांच्या अंमलबजावणी करिता आवश्यक असलेल्या मानके व तपशीलपत्रके, तांत्रिक नियमावली तयार करण्यामध्ये सहाय्य करणे.

३. क्षमता निर्माण करण्यासाठी संसाधन संस्था निश्चीत करणेसाठी राज्यस्तरीय नोडल अभिकरणांना मदत करणे.

४. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन प्रकल्पांचे मूल्यमापन अभ्यास हाती घेवून दृश्य परिणाम अजमावणे.जेणेकरून त्याचा फायदे गुणवत्ता सुधारण्यासाठी होईल.

५. खाजगी क्षेत्र, परदेशातील निधी पुरवणा-या संस्था इत्यादींसह इतर स्त्रोतांमधून अतिरिक्त निधी उपलब्ध करून घेणे

६. पाणलोट क्षेत्र कार्यक्रमाध्ये अंतर्भूत असणा-या सर्व संस्था/संघटना/अभिकरणे/विभाग/मंत्रालये इ.मध्ये प्रभावी समन्वयक यंत्रणा म्हणून काम करणे.

७. प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय संमेलने, चर्चासत्रे आणि कार्यशाळा, अभ्यास दौरे व माहितीच्या आदान-प्रदानाचे आयोजन करणे.

८. तांत्रिक ज्ञान विषयक साधने व तज्ञ व्यक्ती उपलब्ध करून देणे.

### ब. मंत्रालयीन स्तरावर संस्थात्मक व्यवस्था :

प्रत्येक मंत्रालयाला पाणलोट क्षेत्र कार्यक्रमांची देखरेख करण्यासाठी त्यांची स्वतःची कार्यप्रणाली ठरविण्याचे स्वातंत्र्य आहे. सबंधीत मंत्रालयाचे खालीलप्रमाणे कार्ये असेल :

१. मार्गदर्शक सूचनांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राज्यांमधील प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पीय खर्चाचे वाटप करणे.

२. क्षमता निर्माण (मनुष्यबळ विकास) कार्यक्रमांना सर्व स्तरावर सक्रिय पाठींबा देणे.

३. ऑन-लाईन यंत्रणेमार्फत कार्यक्रमाचे संनियंत्रण करणे.

www.mahaagri.gov.in

४. प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय यंत्रणेबरोबर चर्चा करून प्रक्षेत्र भेटी, संनियंत्रण, सामाजिक लेखापरीक्षा व दृश्य परिणाम यांचा अंदाज घेण्यासाठी योग्य कार्यप्रणाली तयार करणे.

५. मुल्यमापन करणा-या अभिकरणांची एक नामिका (पॅनल) तयार करणे आणि मूल्यमापन अभ्यास हाती घेणे.

६. राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्टीय संमेलने, चर्चासत्रे व कार्यशाळा, अभ्यास दौरे, संशोधन/क्षेत्रीय अभ्यास व माहितीचे अदान-प्रदान यात सहभागी होणे .

७. पाणलोट क्षेत्र कार्यक्रमांमध्ये सहभागी असलेल्या सर्व संस्था, संघटना, अभिकरणे, विभाग, मंत्रालये, इत्यादी मध्ये एक परिणामकारक समन्वयक यंत्रणा म्हणून काम करणे.

८. देशातील पर्जन्याधारित क्षेत्रांच्या एकूण व सर्वांगिण विकासासाठी पाणलोट क्षेत्र कार्यक्रम प्रमुख साधन होईल अशी सर्व कामे हाती घेणे.

**क. राष्ट्रीय स्तरावरील माहिती केंद्र व राष्ट्रीय पोर्टल :**

पाणलोट क्षेत्र कार्यक्रमाचे ऑनलाईन संनियत्रण करणेसाठी राष्ट्रिय स्तरावर राष्ट्रीय माहिती केंद्र व राष्ट्रीय पोर्टल स्थापना करणेत येणार आहे.राष्ट्रीय माहिती केंद्र (NDC) हे संपूर्ण देशासाठी पाणलोट कार्यक्रमाकरिता माहिती आणि निधी व्यवस्थापनांचे काम करेल.यामध्ये भूकर विषयक , पाणलोट क्षेत्र, मृदा, जमीन वापर, सामाजिक-आर्थिक निकष, इ.विविध भूपृष्ठीय माहिती प्रणाली उपलब्ध असेल. या माहितीचा उपयोग पाणलोट विकास कार्यक्रम, ग्रामीण रोजगार, जमीन वापर नियोजन, एकात्मिक भागांसाठी सर्वसमावेशक माहिती व जिल्हास्तरावरील नियोजन व संनियंत्रण यांसाठी होईल.

www.mahaagri.gov.in

## राज्यस्तरावरील संस्थात्मक व्यवस्था :

### अ. राज्यस्तरीय नोडल अभिकरण : (SLNA)

सामाईक मार्गदर्शक सुचना मधील परिच्छेद २२ नुसार राज्यासाठी राज्यस्तरिय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणाची स्थापना शासन निर्णय दि.२१ मे २००८ नुसार करणेत आलेली आहे असुन तिची नोंदणी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० खाली करणेत आली आहे. राज्यस्तरिय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेची रचना खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| सचिव (जलसंधारण) | अध्यक्ष |
| प्रधान सचिव (कृषि) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| सचिव (पदुम) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| सचिव (ग्रामविकास) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| प्रधान मुख्य वनसंरक्षक वने | सदस्य |
| उपसचिव (जलसंधारण) | सदस्य |
| राज्य प्रमुख, एनआयसी, मुंबई | सदस्य |
| कृषि आयुक्त | सदस्य |
| संचालक, सामाजिक वनीकरण | सदस्य |
| संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र (एमआरसॅक) | सदस्य |
| संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| मुख्य अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) | सदस्य |
| आयुक्त, पशुसवंर्धन | सदस्य |
| श्री. डॉ के.रामचंद्र, मेंबर, नॅशनल रेनफेड एरिया ऑथरिटी, दिल्ली | सदस्य |
| केंद्रीय कृषि मंत्रालय, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| भू-संसाधन विभाग, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| श्री. डॉ नेमा, मॅनेजिंग डायरेक्टर,नाबार्ड, पुणे | सदस्य |
| श्री. डॉ राजन पवार, सहयोगी प्राध्यापक, यशदा, पुणे | सदस्य |
| मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, औरंगाबाद, स्वयंसेवी संस्था | सदस्य |
| संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे | सदस्य व मुख्य कार्य.अधिकारी. |

www.mahaagri.gov.in

**राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेची  मुख्य कार्ये खालील प्रमाणे असतील :**

१) तालुका स्तरावर व जिल्हास्तरावर तयार करण्यात आलेले पाणलोटांचे यथार्थदर्शी आराखडे, ज्यामध्ये पाणलोट विकासाचे धोरण, वित्तीय नियतव्यय, अपेक्षित साध्य/फलनिष्पत्ती यांचा समावेश असून त्याआधारे राज्याचा आराखडा तयार करणे व केंद्रीय नोडल एजन्सीकडून मंजूर करुन घेणे.

२) राज्याला मंजूर होणा-या निधीमधून स्टेट लेव्हल डाटा संस्था स्थापन करणे व केंद्रीय संस्थेशी ऑन लाईन जोडणी घेणे.

३ ) जिल्हा पाणलोट विकास युनिट (DWDU) तांत्रिक सहाय्य पुरविणे.

४) NRAA/MoRD यांचेशी संपर्क साधून क्षमता बांधणीकरिता राज्यातील संस्थांचे यादीस मंजूरी मिळविणे.

५) पारदर्शक पध्दत वापरुन जिल्हा पाणलोट विकास संस्थेने मंजूर केलेल्या प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणांचे यादीला मान्यता देणे.

६) विविध स्तरावर अंतर्गत/बाहय/त्रयस्थ संस्थामार्फत सनियंत्रण मुल्यांकन करण्याकरिता यंत्रणा स्थापन करणे.

७) NRAA/MoRD यांचेशी संपर्क साधून राज्याकरीता विविक्षित समस्यांकरिता मार्गदर्शक सूचना स्थापन करणे.

राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेला सहाय्य करणेसाठी  खालीलप्रमाणे व्यावसायिक तज्ञांची नेमणुक प्रतिनियुक्तीवर करणेत येईल.

| **अ. क्र.** | **व्यावसायीक तज्ञ** | **कामाचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | कृषि | १. पाणलोट क्षेत्रातील जल व भूमी आधारीत उपक्रम राबविणेसाठी सविस्तर आराखडा तयार करणे.<br>२) नव्या व शाश्वत तत्रज्ञानाची चाचणी आणि प्रात्यक्षिके याबाबत  आराखडा तयार करणे.<br>३) राज्यस्तरावर कृषि संलग्न विभागाशी जसे फलोत्पादन, मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन विभागाच्या समन्वय ठेवून पाणलोटात हाती घ्यावयाच्या विविध योजनाची सांगड घालणे.<br>४) जिल्हा पाणलोट विकास युनिटला कृषि, फलोत्पादन व संलग्न विभागाकडील तांत्रीक सहाय्य पुरविणे.<br>५) विविक्षित समस्याकरिता तांत्रीक मार्गदर्शक संहिता तयार करणे.<br>६) विविक्षित सत्राकरिता मार्गदर्शक सूचना तयार करणे. |
| २. | जल व्यवस्थापन, | १) पाणलोटांचे यथार्थदर्शी व सविस्तर प्रकल्पआराखडे तयार करण्यासाठी जिल्हा पाणलोट विकास युनिटला तांत्रीक सहाय्य पुरविणे.<br>२) राज्याचा पाणलोट विकास आराखडा तयार करणे.<br>३) केंद्रीय नोडल यंत्रणेकडून यथार्थदर्शी आराखडे मंजूर करुन घेणे.<br>४) बैठकीना उपस्थित राहणे.<br>५) सविस्तर प्रकल्प आराखडयाची छानानी करणे.<br>६) मुख्य कार्यकारी अधिकारी सोपवतील ती कामे पार पाडणे |

www.mahaagri.gov.in

| अ. क्र. | व्यावसायीक तज्ञ | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| ३. | क्षमता निर्माण (मनुष्यबळ विकास), | १)पाणलोट क्षेत्रातील विविध घटकासाठी यशदा, पुणे यांनी तयार केलेल्या क्षमता बांधणी आराखडयाची अंमलबजावणी करणे.<br>२) मुख्य कार्यकारी अधिकारी सोपवतील ती कामे पार पाडणे. |
| ४. | सामाजिक चळवळ, | १) सविस्तर प्रकल्प आराखड्याप्रमाणे उपभोक्ता गट, स्वंयसहाय्य गट , तरुणाचे गट, महिलांचे गट तयार करणे व त्यांचे सक्षमीकरण करणेस प्रकायं व पाणलोट विकास पथक यांना मदत करणे. जिल्हा पाणलोट विकास युनिटला विविध प्रकारचे गटाचे संघटन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.<br>२) पाणलोटाचा तपशीलवार कृति आराखडा/रचना कौशल्य, कुशल व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी घ्यावयाच्या ग्रामीण सहभागी समीक्षण(PRA) सुलभ करण्यासाठी प्रकायंना मार्गदर्शन करणे.<br>३) स्वयंसहाय्य/उपभोक्ता गट/समिती यांना पतपुरवठा आणि काटकसर प्रकिया व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करणे.<br>४) राज्यस्तरावर समूह संघटनासाठी मार्गदर्शक सूचना प्रमाणे अंमलबजावणी , समन्वय व सनियंत्रण करणे.<br>५) मुख्य कार्यकारी अधिकारी सोपवतील ती कामे पार पाडणे. |
| ५ | माहिती तंत्रज्ञान, | १) राज्यस्तरावर राज्य माहिती केंद्र स्थापन करुन कार्यान्वयीत करणे.<br>२) जिल्हास्तरावर जिल्हा माहिती केंद्र स्थापन करणेसाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणे.<br>३)राज्य माहिती केंद्र व जिल्हा माहिती केंद्र राष्ट्रीय माहिती केंद्राशी ऑनलाईन जोडणे बाबत कार्यवाही करणे.<br>४) पाणलोट विकास कामाचे संनियंत्रण करणेसाठी NIC च्या सहकार्याने विविध सॉफ्टवेअर तयार करुन त्यांचे कार्यान्वयन करणे.<br>५)स्थापित झालेल्या राज्य माहिती केंद्रातील विविध हार्डवेअर, सॉफ्टवेअर, सर्व्हरची देखभाल व आवश्यक ती संगणकीय प्रणाली निर्माण करणे.<br>६) माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण आराखडा तयार करुन अंमलबजावणी,समन्वय व सनियंत्रण करणे.<br>७) डेटाबेस संनियंत्रण करणे.<br>८) मुख्य कार्यकारी अधिकारी सोपवतील ती कामे पार पाडणे. |
| ६. | प्रशासन | १)विविध कामांचे अंमलबजावणीवर वसुंधरा कार्यालयाचे कामकाजावर देखरेख करणे.<br>२) कार्यालयाशी होणा-या विविध पत्रव्यवहारावर पहाणे व सभेचे कामकाज पहाणे.<br>३) केंद्र शासनाकडील,अन्य राज्यातील,विदेशी व इतर पाहुण्यांचे स्वागत करणे, दौ-याचे नियोजन व व्यवस्थापन करणे.<br>४) मुख्य कार्यकारी अधिकारी सोपवतील ती कामे पार पाडणे. |
| ७. | अर्थ/लेखा . | लेखा विषयक सर्व कामे |
| ८. | तंत्रज्ञ (भौगालिक माहिती प्रणाली) | याबाबत स्वतत्र सुचना देणेत येतील. |

www.mahaagri.gov.in

ब. राज्यस्तरीय माहिती केंद्र (SLDC)

पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाचे संपुर्ण संनियंत्रण करणेसाठी राज्यस्तरावर राज्य माहिती केद्राची स्थापना करणेत येईल. सदरचे माहिती केंद्र जिल्हा माहिती केंद्र व राष्ट्रिय माहिती केंद्राशी ऑन लाईन पध्दतीने जोडणेत येईल.

## जिल्हास्तरावरील संस्थात्मक व्यवस्थाः

### अ. जिल्हा पाणलोट विकास युनिट : (DWDU)

सामाईक मार्गदर्शक सुचना मधील परिच्छेद २९ नुसार पाणलोट विकासाचे जिल्हास्तरावर काम पहाणेसाठी जिल्हा पाणलोट विकास युनिट ची स्थापना शासन निर्णय दि. २१ मे २००८ नुसार करणेत आलेली आहे. जिल्हा पाणलोट विकास युनिटची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | सह अध्यक्ष |
| उपजिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| उपसंचालक, सामाजिक वनीकरण | सदस्य |
| उपवनसंरक्षक | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) | सदस्य |
| वरिष्ठ भू वैज्ञानिक | सदस्य |
| जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी | सदस्य |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | प्रकल्प व्यवस्थापक तथा सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय पाणलोट विकास युनिटची कार्ये**

१) पाणलोट विकास प्रकल्पांचा एकत्रित आराखडा जिल्हा पाणलोट विकास नियोजन आराखडयाकरिता बनविणे, ज्यामध्ये आर्थिक नियोजनाचा समावेश असेल.

२) पाणलोट विकासाकरिता **(SLNA)** ने विहीत केलेल्या पध्दतीनुसार प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाची निवड सुचीमधुन (एम्पॅनेलमेट) शिफारस करणे.

३) पाणलोट विकासाचे वार्षिक आराखडे बनविण्याकरिता व धोरण ठरविण्याकरिता सर्वोतोपरी सहाय्य करणे व सुविधा उपलब्ध करुन देणे.

www.mahaagri.gov.in

४) यशदा, पुणे यांनी तयार केलेल्या पाणलोटातील विविध घटकाकरिता मंजुर क्षमता बांधणी कृति आराखड्याप्रमाणे सहाय्यकारी संस्था (रिसोर्स ऑर्गनायझेशन) चे समन्वायाने अंमलबजावणी करणे.

५) जिल्हयात सुरु असलेल्या पाणलोट विकासाच्या सर्व राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचा एकत्रित आढावा घेणे, सनियंत्रण करणे व स्थानिक परिस्थितीनुसार मार्गदर्शक सूचनांच्या अधिन राहुन योग्य दिशा निर्देश देणे.

६) पाणलोट विकास प्रकल्पास नियमितपणे निधी उपलब्ध होईल याची दक्षता घेणे.

७) विहीत केलेले अहवाल / अभिलेख वेळोवेळी **(SLNA/CLNA)** ला पाठविणे.

८) कृषि, पशुसंवर्धन, ग्रामविकास, फलोत्पाादन इ.कार्यकामांचा समन्वय पाणलोट विकास प्रकल्पांकरिता राखणे जेणेकरुन उत्पादकता व राहणीमान उंचावेल.

९) गावापासून जिल्हयापर्यत पाणलोट विषयक **Data Base** तयार करुन घेणे तो **SLNA** व राष्ट्रिय माहिती केंद्राला जोडणे.

१०) पाणलोट विकास प्रकल्पाचे नियोजन व मंजुरीप्रमाणे अंमलबजावणीकरिता प्रकल्प कार्यान्वीन यंत्रणेस तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देणे.

जिल्हा पाणलोट विकास युनिट, जिल्हा नियोजन समिती बरोबर निकट समन्वयनाने कामकाज करेल. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, (NREGS) मागास प्रदेश अनुदान निधी (BRGF) या योजनांना जिल्हास्तर समिती किंवा जिल्हाधिकारी यांनी प्रकल्पाला द्यावयाची मान्यता व अंमलबजावणी यापुढेही चालू राहील.

जिल्हा पाणलोट विकास युनिटला सहाय्य करणेसाठी जिल्हा स्तरावर पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र **(WCDC)** असेल. हे एक स्वतंत्र युनिट असून त्यात कृषि/पाणी व्यवस्थापन/सामाजिक चळवळ/व्यवस्थापन व लेखा या विषयातील विशेषज्ञ असतील.

| **अ. क्र.** | **व्यावसायीक तज्ञ** | **कामाचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | कृषि | १. पाणलोट क्षेत्रातील जल व भूमी आधारीत उपक्रम राबविणेसाठी सविस्तर आराखडा तयार करणे.<br>२) नव्या व शाश्वत तत्रज्ञानाची चाचणी आणि प्रात्यक्षिके याबाबत आराखडा तयार करणे.<br>३) जिल्हास्तरावर कृषि संलग्न विभागाशी जसे फलोत्पादन, मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन विभागाच्या समन्वय ठेवून पाणलोटात हाती घ्यावयाच्या विविध योजनाची सांगड घालणे.<br>४) बैठकीना उपस्थित राहणे.<br>५) प्रकल्प व्यवस्थापक यांचे आदेशाप्रमाणे कामकाज पार पाडणे. |
| २. | जल व्यवस्थापन, | १) पाणलोटांचे यथार्थदर्शी व सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करण्यासाठी |

www.mahaagri.gov.in

| | | |
|---|---|---|
| | | पाणलोट विकास युनिटला तांत्रीक सहाय्य पुरविणे.<br>२) जिल्हयाचा पाणलोट विकास आराखडा तयार करणे.<br>३) वसुंधरा यंत्रणेकडून यथार्थदर्शी व सविस्तर प्रकल्प आराखडे मंजूर करुन घेणे.<br>४) बैठकीना उपस्थित राहणे.<br>५) प्रकल्प व्यवस्थापक यांचे आदेशाप्रमाणे कामकाज पार पाडणे. |
| ३ | लेखाधिकारी | लेखाविषयक कामकाज पहाणे, प्रकल्प व्यवस्थापक यांचे आदेशाप्रमाणे कामकाज पार पाडणे. |
| ४ | लेखा सहाय्यक | लेखाविषयक कामकाज पहाणे, प्रकल्प व्यवस्थापक यांचे आदेशाप्रमाणे कामकाज पार पाडणे. |
| ५ | डेटा एंट्री ऑपरेटर | पाणलोट कार्यक्रमाच्या भौतिक व आर्थिक प्रगतीची माहिती ऑनलाईन भरणे.व प्रकल्प व्यवस्थापक यांचे आदेशाप्रमाणे कामकाज पार पाडणे. |

पाणलोट विकास पथक सदस्यांची नियुक्ती संदर्भातील सविस्तर सुचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

प्रकल्प व्यवस्थापक, जिल्हा पाणलोट विकास युनिट म्हणुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे काम पहातील. जिल्हा पाणलोट विकास युनिट राष्ट्रीयकृत बॅकेत २ स्वतंत्र खाती उघडेल.एका खात्यात कर्मचारी वर्गाचे वेतन, भत्ते व कार्यलयीन खर्चासाठी प्राप्त झालेला निधी जमा करेल.

दुसरे खाते पाणलोट प्रकल्पासाठी प्राप्त झालेला निधी जमा करणेसाठी वापर करेल. सदरचे बॅक खाते हे जिल्हा पाणलोट विकास युनिटचे अध्यक्ष, जिल्हा पाणलोट विकास युनिटचे सदस्य सचिव तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे सयुक्त नावे असेल व सदरचे खाते संयुक्तपणे हाताळले जाईल. सदरची दोन्ही बॅक खाती बचत स्वरुपाची राहतील. बॅक खाते उघडणेबाबत स्वंतत्रपणे कळविणेत येईल.

**जिल्हा पाणलोट विकास युनिट स्तरावर ठेवावयाच्या नोंदवहया**

१) चेकबुक रजिस्टर

२) केंद्र/राज्य यांचेकडून निधी मिळालेबाबतचे रजिस्टर

३) अनुदान वितरण रजिस्टर

४) प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा व पाणलोट समिती यांचेकडून प्राप्त उपयोगिता प्रमााणपत्र रजिस्टर

५) घटक निहाय भोतिक व आर्थिक प्रगति अहवाल नोंदवही.

**इतर नोंदवहयाचे नमुने स्वतंत्रपणे कळविणेत येतील.**

**पाणलोट विकास कार्यक्रमाचा जिल्ह्याचा यथार्थदर्शी आराखडा तयार करणे.**

जिल्ह्याचा पाणलोट विकास कार्यक्रमाचा यथार्थदर्शी आराखडा तयार करणेसाठी केंद्र शासनाच्या भु संसाधन विभागाने दिलेल्या प्रपत्रात माहिती संकलीत करुन भरणे. तसेच संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषन करुन

www.mahaagri.gov.in

प्रकरणनिहाय आराखडा तयार करुन यथार्थदर्शी व वार्षिक आराखड्यास जिल्हा नियोजन समितीची मंजुरी घेवुन वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेस सादर करावा.

**ब.पंचायत राज संस्थांची जिल्हा व मध्यम स्तरावरील भूमिकाः**

जिल्हयामधील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमावर देखरेख करण्याची पूर्ण जबाबदारी सामाईक मार्गदर्शक सुचना मधील परिच्छेद ३२ नुसार जिल्हा पाणलोट विकास युनिटची असेल आणि ते जिल्हा नियोजन समितीच्या सहकार्याने काम करेल. जिल्हा नियोजन समिती, जिल्हयामधील पाणलोट क्षेत्र प्रकल्पाशी संबंधित यथार्थदर्शी व वार्षिक कृती योजना संमत करेल व प्रशासकीय सहाय्य देईल. जिल्हा नियोजन समिती, जिल्हयातील सर्व योजनांबरोबर पाणलोट विकास योजनांचे एकत्रिकरण करुन त्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवेल. जिल्हा पाणलोट विकास

युनिट, जिल्हा नियोजन समितीला कामाची देखरेख आणि कार्यक्रमाचे नियमित संनियंत्रण व मूल्यमापन करण्यामध्ये मदत करेल. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या या पाणलोट विकास प्रकल्पात विविध विभागाच्या योजनांचा समन्वय, प्रगतीचा आढावा, आपआपसातील वाद मिटवणे इत्यादी मध्ये महत्वाची भूमिका बजावतील.

## प्रकल्प स्तरावरील संस्थात्मक व्यवस्था :

### प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणः (PIA)

केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदर्शक सुचना परिच्छेद ३४ नुसार प्रकल्प क्षेत्रात कार्यक्रमाचे कालबध्द नियोजन, व्यवस्थापन, समन्वयन, सनियंत्रण व अंमलबजावणी इ. कामे करण्यासाठी प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाची आवश्यकता असते. त्याकरिता सदर अभिकरणाची निवड खालील निकष, अटी/ शर्तीच्या अधिन राहून करावयाची आहे. पाणलोट विकास प्रकल्प हाती घेण्यासाठी प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणांची निवड करण्यासाठी व त्याला मान्यता देण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबली जाईल.

केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, अवर्षण प्रवण विकास कार्यक्रम, एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम, नदी खोरे प्रकल्प, पश्चिम घाट विकास कार्यक्रम इ. पाणलोट विकास कार्यक्रम राबविले जातात. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमासाठी **(IWMP)** कृषि विभाग/वन विभाग/ सामाजिक वनिकरण/भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा वसुंधरा मान्यता देईल त्यांनुसार प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करतील.

### प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाची कर्तव्ये आणि जबाबदा-या :

१. निवडलेल्या (प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा संबंधित जिल्हयाच्या जिल्हा पाणलोट विकास युनिट यांच्याबरोबर करार/सामंजस्य करार **(MoU)** प्रपत्र अ प्रमाणे करतील.

www.mahaagri.gov.in

२. निवडलेल्या प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने जिल्हा पाणलोट विकास युनिटच्या मान्यतेने पुर्ण वेळ पाणलोट विकास पथक नेमावे.पाणलोट विकास पथक, प्रकल्प कालावधीपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीकरीता करार/ प्रतिनियुक्ती/ हस्तांतरण इ. वर घेता येईल. पाणलोट विकास पथकाची रचना करार/ सामंजस्य करार यामध्ये देण्यात यावी.

३. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण (पीआयऐ) सहभागी ग्रामीण समिक्षा (**PRA**) पध्दतीचा वापर करून त्याव्दारे पाणलोट क्षेत्राकरीता विकास योजना तयार करणेकरीता पाणलोट समितीला आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन करेल.

४. उपभोक्ता गट, स्वयंसहाय्यता गट, शेतकरी गट, महिला गट, तरुणांचे गट व शेतमजुर इ.पाणलोट घटकांसाठी समुह संघटन व प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेईल.

५. पाणलोट क्षेत्र विकास कामांची सविस्तर प्रकल्प अहवालाप्रमाणे अंमलबजावणी व संनियंत्रण करेल. प्रकल्प लेख्यांची तपासणी करेल व ते अधिप्रमाणित करेल.

६. पाणलोट प्रकल्पात कमी खर्चाच्या तंत्रज्ञानाचा जसे मुलस्थानी मृद व जलसंधारणाच्या पध्दती उदा. मृतसरी उघडणे / जलसंधारण सरी , आंतरमशगतीची कामे पुर्ण झाल्यानंतर काढलेली सरी,जैविक बांध,सरी वरंबा व बंदीस्त सरी,रुंद वरंबा व सरी,बंदीस्त वाफे/ कंपार्टमेंट बंडीग,झाड वर्गीय पिकासाठी वर्तुळाकृती बांध, अर्धचंद्राकृती बांध व व्ही आकाराचे बांध,आच्छादनाचा वापर,आंतरपिके/ मिश्रपिके/ पट्टापिक पध्दत, व विहिर पुनर्भरण, वनराई बंधारे/ कच्चे बंधारे बांधणेबाबत प्रवृत्त करेल आणि स्वदेशी तंत्रज्ञानाची उभारणी करेल.

७. प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवेल. कामाचा प्रगती आढावा घेईल.

८. प्रकल्पोत्तर कामाकरीता संस्थात्मक व्यवस्थांची रचना करेल. तसेच प्रकल्प कालावधीमध्ये निर्माण केलेल्या मत्तांचा सांभाळ करेल.व त्यांचा आणखी विकास करेल.

९. पाणलोट विकास प्रकल्पांकरीता पाणलोट समितीच्या मान्यतेने कृति योजना तयार करून जिल्हा पाणलोट विकास युनिट व जिल्हा नियोजन समिती यांच्या मान्यतेसाठी सादर करणे.

१०. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण हाती घेतलेल्या कामांची प्रत्यक्ष आर्थिक/सामाजीक लेखा परीक्षा करण्याची व्यवस्था करणे.

११. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, मागास प्रदेश अनुदान निधी, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, आदिवासी कल्याण योजना, कृत्रिम भुजल पुर्नभरण, हरीत भारत व इतर शासकीय योजनांमधून अतिरीक्त आर्थिक तरतूद उपलब्ध करून घेणेसाठी तसेच वेगवेगळ्या योजनांचे **Convergence** चे प्रकल्प तयार करुन जिल्हा पाणलोट विकास युनिटला सादर करेल. **वेगवेगळ्या योजनांची सांगड घालण्याची जबाबदारी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.**

१२. तांत्रिक दृष्टया परिपुर्ण आणि उच्च प्रतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून ग्रामसभेच्या मान्यतेनंतर, सविस्तर प्रकल्प अहवाल जिल्हा पाणलोट विकास युनिट यांना सादर करेल.

१३. प्रकल्पातील मृद व जलसंधारणाच्या कामांना तांत्रिक मान्यता प्रदान करणेची जबाबदारी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या प्राधिकरणावर राहील.

१४. प्रकल्प अंमलबजावणीच्या टप्प्यात संबंधीत विभागाच्या त्या त्या स्तरावरील अधिका-याने/कर्मचा-यांनी त्यांना नेमुन दिलेल्या प्रचलित नियमानुसार कामाची  तपासणी व रेकॉर्डीग करणेची जबाबदारि राहिल.

प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण राष्ट्रीयकृत बॅकेत स्वतंत्र खाते उघडेल.या खात्यातुन पाणलोट विकास पथक सदस्याचे वेतन, पाणलोट समिती सचीव यांचे वेतन , भत्ते व कार्यलयीन खर्च इ.साठी प्राप्त झालेला निधी जमा करेल.

**प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण यांनी ठेवावयाचे लेखे-**

१. राज्याकडून मिळालेल्या निधीचे रजिस्टर

२. उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा पाणलोट विकासा यंत्रणेला पाठविलेचे रजिस्टर

३. बॅकखाते पासबुक

४. चेक रजिस्टर

५. बॅक रिकन्सीलेशन स्टेटमेंट रजिस्टर

६. पाणलोट समितीकडून प्राप्त झालेल्या उपयोगिता प्रमाणपत्राचे रजिस्टर

७. भौतिक व आर्थिक प्रगति अहवाल

८. रोकडवही

९. मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालप्रमाणे उपभोक्ता गट, स्वंयसहाय्यता गट व शेतकरी यांना प्रशिक्षण दिलेचे रजिस्टर

१०. प्रकल्पात एकत्रिकरण केलेल्या योजनांचे रजिस्टर

११. वेगवेगळ्या  टप्प्यावर अंमलबजावणी केलेचे रजिस्टर

## ५.३ पाणलोट विकास पथक : (WDT)

केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदर्शक सुचना परिच्छेद ४० नुसार पाणलोट विकास पथक हे प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाचा एक अविभाज्य भाग असून ते प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाकडून स्थापन केले जाईल. प्रत्येक पाणलोट विकास पथकाचे कमीत कमी ४ सदस्य असतील. यामध्ये

१. कृषि/ वन विषय
२. अभियात्रिंकी (स्थापत्य/ कृषि)
३. संस्थात्मक बांधणी / समाज कार्य आणि
४ पशुसंवर्धन

यांचा प्रामुख्याने समावेश असेल. वरील४ सदस्यांपैकी कृषि वन विषयाचा सदस्य हा त्या प्रकल्पांचा क्षेत्रिय पातळीवरील संबंधीत कर्मचा-याशी व उर्वरीत ३ सदस्य हे अभियांत्रिकी/कृषि संस्थात्मक बांधणी व पशुसंवर्धन विषयाचे व्यवसायीक पदवी असणारे असावेत या ३ सदस्यांची नियुक्ती खाली दिल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हतेप्रमाणे जिल्हा पाणलोट विकास युनिटने प्रकल्प कार्यन्वयीन यंत्रणेच्या सहाय्याने करावी. पाणलोट विकास पथक सदस्याचा मानधनाचा खर्च प्रशासकीय खर्चातून देण्यात यावा. तथापि, तो खर्च विहीत केलेल्या प्रशासकीय १० टक्के खर्चाच्या मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. पाणलोट प्रकल्पाची किंमत विचारात घेवुन प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने पाणलोट क्षेत्र विकास पथकाचे मानधन निश्चित करावे. सदस्य हे व्यवसायिक पदवी असणारे असावेत. पाणलोट क्षेत्र विकास पथकाच्या सदस्यांची शैक्षणिक अर्हता व उमेदवाराचा प्रत्यक्षातील क्षेत्रीय अनुभव खालीलप्रमाणे असावा.

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | अनुभव | जबाबदारी |
|---|---|---|---|---|
| १ | कृषि/ वानिकी | बीएस्सी(कृषि/ फलोत्पादन)<br>बीएस्सी(फॉरेस्ट्री) | ०३ वर्षे | १) पाणलोट समिती स्थापन करण्यामध्ये व तिची कार्ये पार पाडण्यामध्ये ग्रामपंचायत / ग्रामसभा यांना सहाय्य करणे.<br>२)पायाभूत सर्वेक्षण व प्रशिक्षण यांचे आयोजन करणे.<br>३) जल व मृदा संवर्धन किंवा त्याचे पुनःप्रापण साठी साधनसंपत्ती विकास योजना तयार करणे.<br>४) समाईक संपत्ती साधने (CPR) व्यवस्थापन आणि हक्कांचे सामाईक वाटप करणे.<br>५) सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी समन्वयक म्हणुन काम करणे.<br>६) पाणलोट समितीचा सदस्य म्हणुन काम पहाणे. त्या अनुषंगाने सचिवाबरोबर धनादेशावर/चेकवर संयुक्त स्वाक्षरी करणे. देयक अदा करणे, नियोजन, मजुरांचे रेकॉर्ड सचिवांचे मदतीने ठेवणे, लेखे ठेवणे.<br>७) विविध शेती पध्दतीचा अवलंब करणेसाठी प्रकल्प क्षेत्राचा आराखडा तयार करणे व अमंलबजावणी करणे. |
| २ | अभियात्रिंकी (स्थापत्य/ कृषि) | बी टेक (कृषि) ,<br>बीई (सिव्हील), | ०३ वर्षे | **१)**प्रस्तावित उपचार/ बांधकामासाठी अभियांत्रिकी दृष्टीने पर्यवेक्षन करणे.<br>२) झालेल्या कामाची भौतिक तपासणी करणे.<br>३)केलेल्या कामाचे सनियंत्रण, तपासणी करणे, त्यांचे मूल्यांकन करणे, प्रत्यक्ष पडताळणी करणे. |
| ३ | संस्थात्मक | बीएसडब्ल्यू/एमएसड | ०३ वर्षे | १) भूमिहिनांसाठी उपजीविकेच्या संधीचा विकास करून त्या उपलब्ध करून देणे. |

www.mahaagri.gov.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बांधणी / समाज कार्य | ब्ल्यू | | २)पीआरए करणे, सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करणे ,भुमिहिन, शेतमजुर व महिला यांचेकरिता उदरनिर्वाहासाठीचे उपक्रम राबविणे.<br>३)प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या साधन संपत्तीचे प्रकल्पपश्यात जतन व देखभाल करणेसाठी उपभोक्ता गट, स्वयंसहाय्यता गट, महिला यांना प्रशिक्षण देणे<br>४)प्रकल्पोत्तर कामांसाठी आणि प्रकल्प कालावधीमध्ये निर्माण झालेल्या मत्तांच्या भविष्यकालिन विकासाकरिता योजना तयार करणे व त्यांची योग्य देखभाल करणे.<br>५) पाणलोट क्षेत्र कृती योजनेमध्ये महिलांच्या सक्रिय सहभागासाठी महिलांना प्रोत्साहन देणे.<br>६) पायाभूत सर्वेक्षण व प्रशिक्षण यांचे आयोजन करणे. |
| ४ | पशुसंवर्धन | बीव्हीएससी/एमव्हीए ससी | ०३ वर्षे | १)मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार शेतक-यासाठी व भुमिहीन यांचेसाठी उदरनिर्वाहाचे उपक्रम राबविणे व त्यांना प्रशिक्षण देणे.<br>२) कृषि विभाग/ ग्रामीण विकास विभागाने स्थापन केलेल्या उपभोक्ता गट व स्वयंसहायता गटांना कुशल प्रशिक्षण देणे, तसेच बॅंकेचे अर्थसहाय्य मिळवुन देणेकरिता मार्गदर्शन करणे. |

उपरोक्तप्रमाणे नेमणूक जिल्हा पाणलोट विकास युनिटने प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या सहाय्याने करावी.

**पाणलोट प्रकल्प पथकाच्या सदस्यांना त्यांनी कामात कुचराई/ बेजबाबदारपणा/ बेशिस्त वर्तणुक केल्यास त्यांना कामावरुन कमी करणेचे अधिकार प्रकल्प कार्यान्वयिन यंत्रणेच्या शिफारशी प्रमाणे जिल्हा पाणलोट विकास युनिटला असतील.**

**पाणलोट विकास पथक सदस्याची नियुक्ती संदर्भातील सविस्तर सुचना स्वंतत्रपणे निर्गमित करण्यात येतील.**

पाणलोट विकास पथकाचे स्थान शक्यतो पाणलोट क्षेत्र प्रकल्पाच्या जवळ राहिल. पाणलोट विकास पथकाच्या सदस्यांच्या मानधन, प्रवास भत्ता या संबंधीचा खर्च हा प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाला दिलेल्या प्रशासकीय बाबींमधून (१० टक्के निधीतुन ) खर्ची टाकावे. जिल्हा पाणलोट विकास युनिट हे पाणलोट क्षेत्र विकास पथकाच्या सदस्यांसाठी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करेल.

**प्रत्येक १० ते १५ सुक्ष्म पाणलोट समुहाच्या पाणलोट प्रकल्पाकरिता किंवा सर्वसाधारणपणे ५००० हे. प्रकल्पाचे (उपचाराचे) क्षेत्राकरिता एक पाणलोट विकास पथकाची नियुक्ती करण्यात यावी.** निवड

www.mahaagri.gov.in

केलेल्या पाणलोट विकास पथकाचे सदस्य पूर्ण वेळ प्रकल्प पूर्ण होईपर्यंत कार्यरत राहतील. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेच्या पूर्व मान्यतेशिवाय प्रतिनियुक्तीवरील पथक सदस्यांची बदली करता येणार नाही.

## गावपातळीवर संस्थात्मक रचना व लोकसहभाग :

**१ स्वयंसहायता गट : (Self-Help Groups)**

पाणलोट समिती, पाणलोट विकास गटाच्या सहाय्याने सर्व शेतकरी, भूमिहीन/मत्ता नसलेले गरीब कृषिमजूर, स्त्रिया, धनगर व अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या व्यक्तींमधून पाणलोट क्षेत्रांमध्ये स्वयंसहाय्यता गट स्थापन करेल. हे गट एकजिनसी गट असतील व त्यांची ओळख व हितसंबंध समाईक असतील, ते त्यांच्या उपजीविकेकरिता पाणलोट क्षेत्रावर अवलंबून असतील. पाणलोटातील प्रत्येक गावात सध्या अस्तित्वात असलेल्या पुरुष व स्त्रियांचे गटांना पाणलोट प्रकल्प कार्यक्रमात सहभागी करुन घ्यावे.( पाणी वाटप संघ, वन समिती,ग्रामीण विकास कार्यक्रमात तयार केलेले गट ) गावात प्रत्येक स्वयंसहाय्यता गटाला त्यांनी हाती घेतलेल्या उपक्रम प्रकल्प किंमतीनुसार फिरता निधी उपलब्ध करुन देणेत येईल. तसेच संबंधित प्रकल्पांचे काम हाती घेण्यापूर्वी त्यांनी तपशिलवार करार करणे अनिवार्य राहिल. तसेच सदरचे गट तयार करणेसाठी कृषि/ वन विभाग/ सामाजिक वनिकरण/संबंधीत शासकिय विभागाचे क्षेत्रिय कर्मचारी मदत करतील.

**२ उपभोक्ता गट : (Users Groups)**

पाणलोट समिती, (WC) पाणलोट विकास गटाच्या सहाय्याने पाणलोट क्षेत्रामध्ये उपभोक्ता गटांची देखील स्थापना करेल. पाणलोट क्षेत्रामध्ये जमीन असलेल्या व्यक्तींचे हे एकजिनसी गट असतील. प्रत्येक उपभोक्ता गटामध्ये विशिष्ट पाणलोट क्षेत्रातील काम अथवा कार्यक्रम यापासून ज्यांना प्रत्यक्ष फायदा होणार आहे अशा व्यक्तींचा गटामध्ये समावेश करावा. पाणलोट समिती, (WC) पाणलोट विकास पथकाच्या सहाय्याने समानता व शाश्वतता या तत्वांवर आधारित असलेल्या उपभोक्ता गटांमधील साधनसंपत्ती वापराचा करार करेल. सदरचे तपशिलवार करार संबंधित काम हाती घेण्यापूर्वी तयार करावेत. संबंधीत कामासाठी ही पूर्व-शर्त म्हणून समजण्यात यावी. प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या सर्व मत्तांच्या प्रवर्तनासाठी व देखभालीसाठी ग्रामपंचायत व ग्रामसभा यांच्या सहयोगाने उपभोक्ता गट जबाबदार असेल.

**३ पाणलोट समिती : (WC)**

केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदर्शक सुचना परिच्छेद ४४ नुसार ग्रामसभा, गावामध्ये पाणलोट विकास पथकाच्या समन्वयाने व कृषि/वन विभाग/ सा. वनिकरण यानी तयार केलेल्या सविस्तर पाणलोट प्रकल्पाच्या (डिपीआर) नुसार अंमलबजावणी करण्यासाठी, संबंधीत गावाची ग्रामसभा पाणलोट समितीची (WC) स्थापना करेल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार पाणलोट समितीची (WC) नोंदणी करणे अनिवार्य राहील. ग्रामसभा, पाणलोट समितीचा अध्यक्ष म्हणून गावातील कोणत्याही योग्य व्यक्तीची निवड करेल/नियुक्ती करेल. पाणलोट समिती कमीतकमी ११ सदस्यांची मिळून बनलेली असेल, त्यातील अर्धे सदस्य स्वयंसहाय्यता गट व उपभोक्ता गट,

www.mahaagri.gov.in

अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती समूह, स्त्रिया, गावातील भूमिहीन व्यक्ती यांचे प्रतिनिधी असतील. पाणलोट विकास पथकाचा एक सदस्य सुध्दा पाणलोट समितीमध्ये प्रतिनिधित्व करेल.

**पाणलोट समितीची रचना खालील प्रमाणे राहील.: (WC)**

१. पाणलोट समिती अध्यक्ष - ग्राम सभेने ठरविलेला

२. उपभोक्ता गटाचे सदस्य - ४ ते ५ सदस्य ( महिला सदस्य — किमान -१ )

३. स्वयंसहाय्य गटाचे सदस्य - ३ ते ४ सदस्य ( महिला सदस्य — किमान -१ )

४. अनु.जाती/अनु.जमाती समुह — १ ते २ सदस्य

५. पाणलोट विकास पथक सदस्य - १ सदस्य (प्रकल्प कार्यान्वीय यत्रणेच्या क्षेत्रिय पातळीवरील कर्मचारी)

६. पाणलोट समिती सचिव - ग्राम सभेने ठरविलेला

ज्या ठिकाणी पाणलोट प्रकल्पामध्ये एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतीचा समावेश होतो त्या ठिकाणी प्रत्येक ग्रामपंचायती करिता स्वतंत्र पाणलोट समिती स्थापन करण्यात यावी. पाणलोट समितीच्या कार्यालयासाठी संबंधित ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

ज्या पाणलोट प्रकल्पामध्ये एकापेक्षा जास्त गावांचा समावेश होतो, त्या ठिकाणी प्रत्येक गावातील एक प्रतिनिधी पाणलोट समितीवर घेणेत यावा. तसेच या समितीला मदत करणेसाठी समाविष्ट प्रत्येक गावस्तरावर आवश्यक तर सल्ला व मदत करण्यासाठी उपसमिती आवश्यकतेनुसार नेमण्यास हरकत नाही.

सामाईक मार्गदर्शक सुचना परिच्छेद ४५ नुसार पाणलोट प्रकल्पाकरिता निधी मिळविण्यासाठी पाणलोट समिती (WC) राष्ट्रीकृत बँकेत एक स्वतंत्र खाते उघडेल. सदरचे बॅक खाते हे पाणलोट समितीचा अध्यक्ष, पाणलोट विकास पथकाचा एक सदस्य व पाणलोट समितीचा सचिव यांचे संयुक्त नावे असेल.पाणलोट समिती सदरचे खाते प्रकल्पातील कामे करणेकरीता वापरेल. पाणलोट समितीच्या वतीने सचीव व पाणलोट विकास पथकाचा नामनिर्देशित सदस्य हे धनादेशावर **संयुक्त स्वाक्षरी** करतील.

पाणलोट समिती सचिवाच्या वेतना संबंधीचा खर्च प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाच्या प्रशासकीय खर्चातून करण्यात येईल. **पाणलोट समितीची बैठक महिन्यातुन एकदा घेणेत यावी.**

## पाणलोट समितीची कार्ये-

**१.** प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांचे प्रकल्प नियोजन नेटप्लॅनिंग व्दारे करुन प्रकल्प आराखडे तयार करण्यास कृषि/वन विभाग/ सामाजिक वनिकरण/ संबंधित शासकिय विभाग, पाणलोट विकास पथकास आणि प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणास सहाय्यक करेल.

**२.** उपचार कामांची अंमलबजावणी करणे

www.mahaagri.gov.in

३. पाणलोट कामाची देखभाल व दुरुस्ती करणे केल्याजाणा-या कामांच्या नोंदीकरणे व संपूर्ण अभिलेख जतन करणे, हिशोब ठेवणे या कामाची जबाबदारी संबंधीत समितीची राहील.

४. गरजेनुसार निधीची मागणी करणे- पाणलोट विकासाचे काम जलदगतीने करणे

५. प्रत्येक तीन महिन्यांत झालेल्या कामाचा तपशील व खर्च ग्रामसभेसमोर सादर करेल.

६. समितीच्या लेख्यांचे वार्षिक विवरण व कामकाज दैनंदीन सोईसाठी स्वतंत्रपणे ठेवण्यांत यावे

७. वितरीत निधीतून पाणलोट विकासाची कामे वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे करण्यात यावीत. पाणलोटांतर्गत झालेल्या कामाची देयके वेळेत अदा करण्याची जबाबदारी पाणलोट समितीची राहील.

८. ग्राम पाणलोट समितीला मृद व जल संधारण तसेच वनिकरण कामातील नियोजन व अंमल बजावणी सल्ला / मदतीसाठी गरजेनुसार संबंधीत शासकीय यंत्रणेचे (कृषि, वने,लघुपाटबंधारे इत्यादी), निमशासकीय यंत्रणा / जिल्हापरिषदेचे ग्रामीण-स्तर अधिकारी / कर्मचारी विशेष आमंत्रीत म्हणून ग्राम पाणलोट समितीत सहभागी करण्यांत येईल. परंतु संबंधीत विशेष निमंत्रीतांना मतदानाचे अधिकार रहाणार नाहीत.

९. पाणलोट समिती, पाणलोट विकास पथकाच्या सहाय्याने शेतकरी, भूमीहीन / मत्ता नसलेले गरीब कृषि मजूर, स्त्रिया, धनगर, व अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या व्यक्तींमधून पाणलोट क्षेत्रामध्ये स्वयंसहाय्यता गट स्थापन करेल. हे गट एकजिनसी गट असतील. व त्यांची ओळख व हितसंबंध सामायीक असतील ते त्यांच्या उपजिविकेकरीता पाणलोट क्षेत्रावर अवलंबून असतील.

१०. पाणलोट समिती, पाणलोट विकास पथकाच्या सहाय्याने पाणलोट क्षेत्रामध्ये उपभोक्ता गटांची देखील स्थापना करण्यास सहभाग घेईल.. प्रत्येक काम / कार्यक्रमामुळे जास्त प्रमाणात बाधीत झालेल्या आणि पाणलोट क्षेत्रामध्ये जमीन असलेल्या व्यक्तींचे हे एकजिनसी गट असतील. प्रत्येक उपभोक्ता गटामध्ये विशिष्ट पाणलोट क्षेत्रातील काम अथवा कार्यक्रम या पासून ज्यांना प्रत्यक्ष फायदा होण्याची शक्यता आहे अशा व्यक्तींचा समावेश असेल. प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या सर्व मत्तांच्या प्रवर्तनासाठी व देखभालीसाठी ग्रामपंचायत व ग्रामसभा यांच्या सहयोगाने उपभोक्ता गट जबाबदार असेल.

११. प्रकल्पातर्गत वेगवेगळ्या योजनांची सांगड (Convergence of Scheme) घालणेसाठी पाणलोट समिती समन्वय / सहभाग घेईल.

## ४. सचिव, पाणलोट समिती :

पाणलोट समितीचा सचिव हा ग्रामसभेच्या बैठकीत ठरविणेत येईल.ही व्यक्ती पंचायत सचिवाखेरीज भिन्न व स्वतंत्र पगारी व्यक्ती असेल. पाणलोट समितीच्या सहाय्याखेरीज सचिवाकडे कोणत्याही जबाबदा-या नसतील.



www.mahaagri.gov.in

१. शैक्षणिक अर्हता - पाणलोट समिती सचीवाची शैक्षणिक अर्हता ,बिगर आदिवासी भागात किमान १२ वी पास व आदिवासी भागात किमान १० वी पास राहिल. कृषि पदवीधर/पदवीकाधारक असल्यास प्राधान्य देण्यात यावे.

२. वेतन मर्यादा – पाणलोट सचिवाचे वेतन प्रकल्पासाठी मंजुर असलेल्या प्रशासकीय बाबीची तरतुद विचारात घेवून प्रकल्प कार्यान्वयिन यंत्रणेने ठरवावी. तथापी ही रक्कम रु. ३०००/- पेक्षा जास्त असता कामा नये.

३. निवड प्रक्रिया – पाणलोट समिती सचिव निवडीसाठी गावातील अर्हताप्राप्त उमेदाराचे अर्ज पाणलोट समितीकडे प्राप्त करुन त्यातुन सचिवाची निवड ग्रामसभेने करावी. अर्ज प्राप्त करणेसाठी गावामध्ये दवंडी/ नोटिस बोर्डावर १० दिवसाची प्रसिध्दी देवून अर्ज प्राप्त करावेत.पाणलोट सचिवाची निवड ग्रामसभेच्या मान्यतेने व प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेच्या मंजुरीने पुर्ण करावी.

४. पाणलोट समिती सचिव नेमणुकीबाबतचा करारपत्र प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने पाणलोट समितीला उपलब्ध करुन देणेत यावे. सदरची नेमणुक ही पाणलोट प्रकल्प कालावधीपुरतीच असल्याने याबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

५. अध्यक्ष,पाणलोट समिती (WC) व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली सचीव काम करेल. सामाईक मार्गदर्शक सुचनानुसार पाणलोट समिती सचिवाच्या नियुक्तीला ग्रामसभेच्या बैठकीमध्ये मान्यता घेणेत यावी. पाणलोट समिती (WC) सचिवाच्या (मानधन) वेतनावरील खर्च प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाच्या प्रशासकीय खर्चातून करण्यात येईल.

**पाणलोट समिती सचिवाच्या जबाबदा-या खालीलप्रमाणे असतील :**

**१.** पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाच्या संदर्भातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता

ग्रामसभा आयोजित करण्यासाठी ग्रामसेवकास कळविणे. पाणलोट समितीच्या प्रत्येक बैठकीमध्ये मागील खर्चाचा आढावा, झालेला खर्च योग्य आहे का याची तपासणी बॅंक खातेपुस्तकावरुन करणेत यावी. तसेच झालेला खर्च व नोंदविलेला खर्च बरोबर आहे का याबाबतचे सर्व दस्ताऐवज पाणलोट समितीच्या बैठकीत सादर करणे. पाणलोट समिती बैठक बोलावणेसाठी सभेची नोटिस ८ दिवस अगोदर काढणे.

**२.** बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाही बाबत पाठपुरवा व समन्वय करणे.

**३.** पाणलोट समिती (WC) व पाणलोट विकास प्रकल्पाकरिता असलेल्या इतर संस्था यांच्या बैठकामधील कार्यवाही बाबतचे सर्व अभिलेख अद्ययावत ठेवणे.

**४.** वेतन व इतर वित्तीय व्यवहारांची नोंद करणे.

**५.** पाणलोट समितीच्या वतीने पाणलोट विकास पथकातील कृषि/वनविभागाच्या व्यक्ती बरोबर धनादेशावर <u>संयुक्त स्वाक्षरी</u> करणे.

६. कामाची देखरेख , कामाची आखणी व कामे करुन घेणे.

www.mahaagri.gov.in

७. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या सुचनेनुसार मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पातील कामाची अंमलबजावणी करणे. तसेच आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देणे.

८. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या निर्देशानुसार सचिव कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये भाग घेईल.

९. उपभोक्ता व स्वंयसहाय्य गटांना त्यांचे लेखे ठेवणेस मदत करणे.

१०. लेखाविषयक ठरवुन दिलेले सर्व दस्ताऐवज अद्यायावत ठेवणे.तसेच पाणलोट समिती कार्यालयास सचिव हा पुर्ण जबाबदार असेल.

सचिव यांनी गैरवर्तन/ गैरप्रकार / बेजबाबदार वर्तन केलेचे दिसुन आलेस किंवा काम समाधानकारक नसल्यास त्यांना कामावरुन काढुन टाकणेचा अधिकार पाणलोट समितीस असेल व याबाबत कोठेही दाद मागता येणार नाही. तसेच गैरवर्तन करताना पाणलोट समितीने सचिवास पाठीशी घातलेस व प्रकल्पाच्या कामात बाधा येत असल्यास सचिवाला कामावरुन काढणेसाठी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेला अधिकार असेल.

पाणलोट समितीस त्यांचे दैनंदिन कामकाज करणेसाठी लागणा-या आकस्मिक खर्चाची (लेखन सामुग्री, बैठकीचा खर्च इ.) रकमेची मागणी पाणलोट समितीने प्रकल्प कार्यान्वीत यंत्रणेकडे आवश्यकतेनुसार करावी. तसेच पाणलोट समितीच्या सचिवाला कार्यालयात कामकाज करणेसाठी एक लहान टेबल, खुर्ची व सतरंजी प्रकल्प कार्यान्वयिन यंत्रणेने खरेदी करणेसाठी एक ठराविक रक्कम त्यांचे प्रशासकीय खर्चातील तरतुदीतुन देणेत यावी.

**पाणलोट समिती स्तरावर ठेवावयाच्या अभिलेख**

१. रोकडवही

२. आकस्मिक देयक नोंदवही

३. व्हाऊचर नोंदवही

४. बॅंकखाते पासबुक

५. बॅंक रिकंन्सीलेशन स्टेटमेंट रजिस्टर

६. ॲडव्हान्स/ॲडजेस्टमेंट नोंदवही

७. बॅंक चेकबुक रजिस्टर

८. मत्ता नोंदवही

९. पाणलोट मत्तेपासून मिळालेल्या उत्पन्नाचे नोंदवही

१०. पाणलोट विकास निधी नोंदवही

११. फिरता निधी नोंदवही

१२. भौतिक व आर्थीक प्रगति अहवाल नोंदवही. नोंदवहयांचे नमुने स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

www.mahaagri.gov.in

**५. ग्रामपंचायतीची भूमिका :**

पाणलोट प्रकल्प राबविताना ग्रामपंचायत खालील महत्वाची कामे करेल :

१. पाणलोट समितीचे पर्यवेक्षण करणे, पाणलोट समितीला सहाय्य करणे व वेळोवेळी सल्ला देणे.

२. पाणलोट समिती व पाणलोट विकास प्रकल्पाच्या लेखे/खर्च विवरणपत्रे अधिप्रमाणित करणे. प्रकल्पाचे लेखे / खर्च विवरणपत्रे ग्रामपंचायतने अधिप्रमाणित केली नाहीत तर सदरची बाब ग्रामपंचायत अधिनियम १९६० नुसार ----- यांचेकडे पाणलोट समितीने सादर करावी.

३. विविध प्रकल्प/योजना पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाकडे एकत्रिकरण करणे.

४. पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांतर्गत मत्तांची नोंदवही ठेवणे म्हणजे पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पानंतर त्या तशाच टिकून राहतील.

५. पाणलोट समितीला कार्यालयाची जागा व इतर आवश्यक सुविधा पुरविणे.

६. पात्र उपभोक्ता गट/स्वयंसहायता गट यांना निर्माण झालेल्या मत्तांवरील फलोपभोग हक्कांचे वाटप करणे.

**प्रकल्प व्यवस्थापन :**

पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांची मुख्य कामे :

१. पूर्वतयारी टप्पा

२. पाणलोटाची कामे आणि

३. एकत्रिकरण व प्रकल्पोत्तर कामे

अशा क्रमाने केली जातील. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची विस्तारीत व्याप्ती व त्यानुसार वाढणा-या अपेक्षा लक्षात घेता प्रकल्प कालावधी हा **४ ते ७ वर्षांचा** असेल. सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावित प्रकल्प कालावधीचे सविस्तर विवरण असावे. प्रकल्प कालावधी हा केंद्रीय मंत्रालयाने ठरवून दिल्यानुसार खालील विभिन्न भागांमध्ये विभागलेला असेल.

| **भाग** | **नांव** | **कालावधी** |
|---|---|---|
| एक | पूर्वतयारी टप्पा | १ - २ वर्षे |
| दोन | पाणलोटाची कामे टप्पा | २ - ३ वर्षे |
| तीन | एकत्रिकरण व प्रकल्पोत्तर कामे | १ - २ वर्षे |

**८.१ पूर्वतयारीचा टप्पा : (Prepretary Phase)**

पुर्व तयारी टप्प्यामध्ये लोक सहभागाकरिता योग्य यंत्रणेची उभारणी करणे आणि स्थानिक संस्था जसे पाणलोट समिती, स्वयंसहाय्यता गट व उपभोक्ता गट सक्षम करणे इ.कामे प्रथम हाती घ्यावीत. या टप्प्यादरम्यान, पाणलोट विकास पथक सुविधा पुरविण्याचे काम करेल. या टप्प्यातील मुख्य कामे खालील प्रमाणे असतील :



www.mahaagri.gov.in

**१. पाणलोट समिती संबंधी करावयाची कार्यवाही (WC)**

- ग्राम सभेव्दारे पाणलोट समिती (WC) चा अध्यक्ष व सचिव यांची निवड करणे.
- पाणलोट समितीची नोंदणी धर्मादाय आयुक्त यांचेकडे संस्था अधिनियम १८६० खाली करणे.
- पाणलोट समिती (WC) चे खाते राष्ट्रीयकृत बॅकेंत उघडणे.
- पाणलोट समिती (WC), स्वयंसहाय्यता गट (SHGs) व उपभोक्ता गट (UGs) यांचा विकास होण्याच्या दृष्टीने सुरूवात करणे.
- पाणलोट समिती (WC), स्वयंसहाय्यता गट (SHGs) व उपभोक्ता गट (UGs) तील सदस्यांचे कामासंबंधी प्रशिक्षण आयोजित करणे इ. कामे पुर्व तयारी टप्प्यात पुर्ण करणे.

**२. प्रेरक प्रवेश उपक्रम हाती घेणे.**

पाणलोट विकास पथकाची विश्वासनियता प्रस्थापित करण्यासाठी व गाव समूहाबरोबर संबंध निर्माण करणेसाठी खालील कामे हाती घ्यावीत.

- सामूहिक नैसर्गिक साधनसंपत्तीचे पुनरूज्जीवन उदा. गाव तलावातील मजबुतीकरण व दुरुस्ती. पिण्याचे पाणी विहीर दुरूस्ती, व मजबुतीकरण करणे, अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा योजनाची दुरुस्ती, विहीरीमध्ये हाड्रोफ्रॅक्चरींग करणे. पारंपारिक वॉटर हार्वेस्टिंग उपचारांचे सुधारणा करणे इ.

१. समाईक बायोगॅस उभारणी

२. सायलोज उभारणी.

३. कृत्रिम रेतनाचे कॅम्प घेणे तसेच याबबतचे साहित्य उपलब्ध करुन देणे.

४. चारा पिकाच्या नविन वाणांची लागवड.

५. अपारंपारिक ऊर्जा साधने जसे सोलर पथ दिवे बसविणे.

६. सध्याच्या शेती पध्दतीमध्ये उत्पादकता वाढविणे साठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन, नविन लागवड पध्दतीची प्रात्यक्षिके, कार्यशाळा, भेटी आयोजित करणे.

**प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत गावाच्या प्रवेशद्वाराजवळ कमान उभारणे या सारखी कामे हाती घेता येणार नाहीत.**

- प्रेरक प्रवेश उपक्रमाचे काम हाती घेणेसाठी प्रकल्प किंमतीच्या ४ टक्के निधी वापरणेत यावा.
- प्रेरक प्रवेश उपक्रमातर्गत हाती घ्यावयाच्या उपक्रमाची अंदाजपत्रके पाणलोट विकास पथकातील अभियंता यांचेकडून तयार करुन घ्यावीत.
- पाणलोट समितीने प्रेरक प्रवेश कामे गावामध्ये सुरु करताना मजुर संघ/सहकारी संस्था/बचत गट यांचेकडुन प्रचलित दर सुचीनुसार कामे पुर्ण करुन घ्यावीत.

www.mahaagri.gov.in

- **पाणलोट प्रकल्पनिहाय / गावनिहाय नियोजित प्रेरक प्रवेश कामांचा आराखडा तयार करुन जिल्हा पाणलोट विकास युनिटच्या शिफारशींने वसुधरा पाणलोट विकास यंत्रणेकडे पाठविण्यात यावा.**
- प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत घ्यावयाच्या उपक्रमांमध्ये संबधीत गावातील ग्रामस्थांनी प्रती कुंटुंब कमीत कमी २ दिवस श्रमदान करणे अनिवार्य राहील. जे ग्रामस्थ श्रमदान करणार नाहीत त्यांनी तेवढ्या दिवसाची लोकवर्गणी जमा करणे आवश्यक राहील.

**३.** पाणलोट विकास प्रकल्पाअंतर्गत गावामध्ये वातावरण निर्मिती, जनजागृती साठी खालील कार्यक्रम हाती घ्यावेत, जेणेकरुन प्रकल्पांतर्गत लोकांमध्ये सहयोगी प्रतिसाद निर्माण होईल.

- गावाच्या प्रवेशव्दारावर योजनेच्या नावाचा लोखंडी फलक लावण्यात यावा. सदरच्या फलकाचा आकार ६ फुट x ४ फुट असावा.
- प्रकल्पांतर्गत गावामध्ये मंजुर पाणलोटविषयक माहिती दर्शविणारा फलक दर्शनी भागात रंगविणे. यामध्ये योजनेचे नाव, पाणलोटाचे नाव, पाणलोटातील समाविष्ट गावे, पाणलोटाचे क्षेत्र, उपचाराचे क्षेत्र, प्रकल्पाची किंमत, प्रकल्प कालावधी, अध्यक्ष व पाणलोट समिती सचिव यांची नावे इ. माहिती देणेत यावी.
- माहिती दर्शविणारे फलक हे प्रकल्प क्षेत्रात दर्शनी भागात जसे , मुख्य रस्त्याच्या कडेला, गावाच्या प्रवेशद्वाराजवळ लावावेत.
- जनजागृतीसाठी गावामध्ये पाणलोटावर आधारित पथनाट्य/ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.
- वातावरण निर्मिती व जनजागृती यासाठी येणारा खर्च क्षमता बांधणी याबाबीखाली उपलब्ध असलेल्या निधीमधुन भागविणेत यावा.

**४.** सविस्तर प्रकल्प अहवालाकरिता (DPR) आवश्यक असणारे पायाभूत सर्वेक्षण , स्थळ निश्चिती , लाभार्थी निवड व माहिती गोळा करणे.

**५.** संभाव्य भूजल पुनर्भरण, भूजल साठा व भूजलाचा योग्य वापर याची क्षेत्रे नकाशामध्ये दाखविण्यासाठी पाणलोट क्षेत्राचे भूपृष्ठीय सर्वेक्षण करणे.

**६.** तांत्रिक सहाय्यता अभिकरणाचे जाळे उभारणे. प्रशिक्षण देणा-या संस्थाची निश्चिती करणे, प्रशिक्षणासाठी सदस्यांची निवड इ. कामे करणे.

**७.** कामे करावयाचे लाभार्थी , कामाच्या जागांची निवड, आराखडे व कामांचा खर्च यांचा समावेश असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. या मध्ये महिला, दलित, अदिवासी व भूमिहीन यांचे हित पुरेशाप्रमाणात प्रतिबिंबित झाले आहे याची खात्री करणे.

www.mahaagri.gov.in

८. उपभोक्ता गटाच्या सदस्यांमध्ये समता व शाश्वतता या तत्वांवर आधारित सहयोगी पध्दतीने (भूपृष्ठ जल, भूजल व सामूहिक/वनजमीन फलोपभोगाकरिता) सविस्तर साधनसंपत्ती वापर करार तयार करणे.

**९. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे : (DPR)**

जिल्हा पातळीवर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे हे कठीण काम असल्याने निवडलेल्या पाणलोट प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी पाणलोट विकास पथकाचे सहाय्य देण्यात यावे.

खाजगी जमीन व सामूहिक जमीन विकासाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना सक्षम ग्रामीण लोकसहभाग आणि भूकर माहितीसह लाभार्थीस्तरावरील सविस्तर माहिती स्वतंत्रपणे आवश्यक आहे. सहभागीय ग्रामीण समिक्षण **(PRA)** मध्ये खालील पध्दतीचा वापर करुन माहिती गोळा करणेत यावी. कृती आराखडा करताना या माहितीचा उपयोग होईल.

१. सामाजिक व साधन संपत्ती नकाशा
२. शिवार फेरी
३. हंगामाचे विश्लेषन
४. गावातील इतिहासकालीन घटनाक्रम
५. मॅट्रीक्स रॅकींग
६. चपाती आकृती
७. स्थानिक तंत्रज्ञानाची साधने

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रकारच्या पायाभुत सर्वेक्षणांचा वापर करावा .

- **फिजोओग्राफी सर्वे** – यामध्ये पाणलोटाचे नाव, स्थळ, आकार , टोपोग्राफी - उतार , निचरा
- **हवामानविषयक सर्वे** – यामध्ये हवामानविषयक सर्वसाधरण माहिती, दररोजचा,महिन्याचा व वार्षिक पर्जन्यमान व पावसाचे दिवस , पर्जन्यमानाची तिव्रता, तपमान, आर्द्रता, सुर्यप्रकाचे तास, वा-याची दिशा व गती, बाष्पीभवन व इव्हॅपोट्रान्स्पीरेशन इ. माहिती गोळा करावी.
- **भुमी उपयोगिता वर्गिकरण**- यामध्ये जमिनचे टेक्शर , सामु (पीएच), उपलब्ध सेद्रिंय कार्बन,जमिनीची खोली, जमीनीची जडणघडन, पाणी मुरण्याची गती, उपलब्ध नत्र,स्फुरद व पालाश इ. ची माहिती.
- **जमिन वापर व वन आच्छादना सर्वे** – यामध्ये कृषी व फलोत्पादन खालील जमीन , जिरायत व बागायत क्षेत्र , पिकाची घनता, वनाखालील जमीन , वनाचा प्रकार, मालकी हक्क, कॅनॉपी, बॉयोटीक प्रेशर, कृषि वानिकी, वृक्षाचा प्रकार, कुरणे , उंची , गवताखालील क्षेत्र , गवताचे स्थानिक मुख्य प्रकार, तसेच रस्ते व गावठानाखालील जमिन, इतर प्रकाराखालील जमिनीची माहितीचा समावेश करावा.

www.mahaagri.gov.in

- **भुजल सर्वे** – यामध्ये कंटुर नकाशा, उताराचा नकाशा, ड्रेनेज नकाशा, पृष्ठभागीय व सब सर्फेस पाण्याची माहिती, विहीरी, बोअर वेल्सची माहिती, सध्या अस्तित्वात असलेली शेततळी, पाझर तलाव इ. ची माहिती, अवनत जमिनीचे प्रमाण, पाण्याची पातळी , माती वाहुन जाण्याचे प्रमाण,अपधावेचे प्रमाण इ.
- सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण

सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये वरील पायाभुत सर्वेक्षणातील माहितीसह खालील बाबींचा समावेश करावाः

**क.** पर्जन्यमान, तापमान, भौगोलिक समकक्षा या सह पाणलोटाचे स्थान, प्रदेशवर्णन, लोकसंख्याशास्त्रात्मक वैशिष्टये, समाजशास्त्रीय तपशील, जमीन वापराचे स्वरूप, मुख्य पिके व त्यांची उत्पादकता, सिंचन, पशुधन, सामाजिक-आर्थिक दर्जा, इ.

**ख.** अपेक्षित/प्रस्तावित उपभोक्ता गट व स्वयंसहायता गट यांचे तपशील, खाजगी जमीन/सामाईक जमीन यांवरील कार्यक्रमांकरिता मुख्य तपशील, पाणलोट विकास निधीसाठी सहाय्य, जमीन वापराची माहिती ,भुगर्भातील पाणी उपसा, पुनर्रभरण व साठवणूक इत्यादीशी संबंधित विद्यमान मत्ताबाबत क्षेत्रनिहाय तपशील देणेत यावा.

**ग.** उपजीविका संभाव्यता/क्षमता वाढविण्याच्या चौकटीतून हस्तक्षेपाची आवश्यकता असलेल्या मोठया समस्यांसह मुख्य प्रश्न ,त्याच बरोबर साधन संपत्तीचे संरक्षण व पुनर्निर्मिती बाबतचा तपशील देणेत यावा.

**घ.** पाणलोट विकास गटाने प्रमाणित केलेल्या तांत्रिक तपशील व नकाशांसह अपेक्षित अडथळयांचा तपशील (वेळापत्रक- भौतिक व अर्थिक अडथळे)

**ड.** विविध टप्प्यावरील कामांचे सविस्तर कृती आराखडे.

**च.** संस्थात्मक रचना व सहयोगी निर्णय क्षमता व प्रकल्पोत्तर शाश्वतता इ.तपशीलासह प्रकल्प कार्यान्वयन करार करणे.

**छ.** विविध घटकांकरिता उपजीविका, महिलांना फायदे व साधनसंपत्तीची पुनर्निर्मिती/संरक्षण इत्यादी बाबत अपेक्षित परिणाम व फायदे याची माहिती देणेत यावी.

**सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची जबाबदारी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेची असेल. पाणलोट विकास पथक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी समन्वयक म्हणुन पाणलोट समितीच्या (WC) सक्रिय सहभागाने पाणलोट क्षेत्राच्या एकात्मिक विकासाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करेल.** ज्या ठिकाणी कृषि विभाग प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणुन असेल त्या ठिकाणी कृषि विभाग सविस्तर अंदाजपत्रके तयार करेल. सविस्तर प्रकल्प अहवाल तयर करणेचा प्रदिर्घ अनुभव कृषि खात्याला असल्यामुळे कृषि खात्याने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावा.तसेच ज्या ठिकाणी वन विभाग/ सामाजिक वनिकरण प्रकायं असेल त्या ठिकाणी कृषि विभागाने शेतकरी / भुमिहिनासाठी उदरनिर्वाहाच्या साधने निर्माण करणेसाठी मदत करावी. पाणलोट विकास पथकाने सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करताना व त्याला अंतिम रूप देताना जल संपत्ती,

www.mahaagri.gov.in

जमीन वापर नकाशा, धुपीचा नकाशा, भुजल नकाशा, भुकर नकाशा, पाणलोटाच्या सिमा दर्शविणारा नकाशा इ.विविध नकाशांचा वापर करावा. तसेच सविस्तर प्रकल्प अहवालात सर्वेक्षण क्रमांकाच्या तपशीलासह पाणलोट क्षेत्राच्या स्पष्ट सीमारेषा, मालकीबाबतचे तपशील व प्रत्येक वर्षा करिता प्रस्तावित कामे /कामाचे स्थान रेखाटलेले नकाशांचा समावेश करावा.

**सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी बाहय यंत्रणाची मदत घेणे :-** सविस्तर पाणलोट प्रकल्प हा पाणलोट प्रकल्पाचा आत्मा असून यामध्ये प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाच्या उपचारांचा समावेश आहे. म्हणून सविस्तर प्रकल्प अहवाल पध्दतशीरपणे व अचूक माहितीच्या आधारे करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकल्प अहवाल उच्च प्रतीचा होणेकरीता शासनाने बाहय यंत्रणाची मदत घेणेबाबत मान्यता दिलेली आहे. राज्यामध्ये आरआयडीएफ पाणलोट प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी ४५ संस्थांना मान्यता दिली असून त्या संस्थाकडून प्रती हेक्टर रु.५२/- याप्रमाणे मापदंड वापरुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यात यावा. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसंदर्भात मान्यता प्राप्त ४५ संस्थांची यादी यापूर्वीच आपणाकडे पाठविण्यात आलेली आहे.याचा उपयोग करण्यात यावा.

**इतर योजना/प्रकल्पांबरोबर कार्यक्रमाची सांगड :**

विविध योजना व कार्यक्रम विशेषतः भारत निर्माण व इतर महत्वाकांक्षी योजनांच्या साधनसंपत्तीचे पाणलोट क्षेत्र विकास योजनांबरोबर समन्वयन करण्यास व त्यांचे एकत्रिकरण करण्यास ११ व्या पंचवार्षिक योजनेत मोठी संधी प्राप्त झाली आहे. जिल्हास्तरीय योजनांची तयारी बंधनकारक असल्यामुळे कार्यक्रमांचे समन्वय साधने शक्य झाले आहे. सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये भरून काढावयाच्या उणिवांची किंवा मागास प्रदेश अनुदान निधी (BRGF), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NREGS), भूजलाचे कृत्रिमरीत्या पुनर्रभरण, तळे, जलसाठा व यांचे नूतनीकरण व दूरूस्ती यामधून हाती घ्यावयाची पाणलोटाची कामे याची सविस्तर माहिती प्रकल्प अहवाल असेल. सुधारित कृषि उत्पन्न बाजार समिती (APMC) अधिनियमाद्वारे पणन व मूल्यावर्धित वाढ करणे सुध्दा शक्य आहे. इत्यादी योजनाची सांगड घालणेत यावी. या योजनामधील ज्या मृद व जल संधारणाच्या संबंधित अनुज्ञेय कामाची सांगड पाणलोट प्रकल्पात घालावयाची आहे त्याची संपुर्ण तपशीलवार माहिती सविस्तर प्रकल्प अहवालात दर्शवावी.

**खालील योजनामधुन खालीलप्रमाणे मृद व जल संधारणाच्या कामाची सांगड पाणलोट प्रकल्पात घालता येणे शक्य आहे.**

| उपचाराचे नाव | राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा | पाणलोट विकास कार्यक्रम | राष्ट्रीय कृषि विकास योजना | राष्ट्रीय फलोत्पादन अभियान | मागास भाग विकास निधी | जलसंपदा विभागाच्या योजना | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **जलसंधारण** | | | | | | | |
| १.माथा भागातील उपचार | ✓ | ✓ | - | - | - | - | - |
| २.चेक डॅम | ✓ | ✓ | - | - | - | - | - |
| ३.शेततळे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | |
| ४.इतर मृद व जलसंधारणाचे उपचार | ✓ | ✓ | - | - | ✓ | ✓ | - |
| **दुष्काळ प्रतिबंध उपचार** | | | - | - | - | - | - |
| वनिकरण | ✓ | ✓ | - | - | - | - | - |
| वृक्ष लागवड | ✓ | ✓ | - | - | - | - | - |
| फळबाग लागवड | ✓ | ✓ | ✓ | ✓ | | | |
| **सिंचन कामे** | | | | | | | |
| १.लघुपाटबंधारे | ✓ | - | - | - | - | ✓ | - |
| २.सुक्ष्म सिंचन | ✓ | ✓ | ✓ | ✓ | - | ✓ | - |
| **अनु जाती/ जमाती/ दारिद्र रेषेखालील शेतकरी यांना सिंचन सुविधा** | ✓ | - | - | - | - | - | - |
| **जलस्तोत्राचे पुनर्जिवन** | | | | | | | |
| **१. गाळ काढणे** | ✓ | ✓ | - | - | - | - | ✓ |
| **२. दुरुस्ती** | ✓ | ✓ | - | - | - | - | ✓ |
| **जमिन विकास** | | | | | | | |
| **१. समाईक जमिन** | ✓ | ✓ | - | - | - | - | - |
| **२. अनु.जाती/जमाती/ दारिद्र रेषेखालील शेतक-यांच्या वैयक्तिक जमिनी** | ✓ | ✓ | ✓ | | - | - | - |
| **पुर नियंत्रण** | ✓ | - | - | - | - | - | ✓ |
| **संरक्षण कामे** | ✓ | - | - | - | - | - | ✓ |
| **पाणथळ जमिनीची निच-याची कामे** | ✓ | ✓ | ✓ | - | - | - | ✓ |

www.mahaagri.gov.in

पाणलोट क्षेत्राकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल हा जिल्हा यथार्थदर्शी आराखडयानुसार तयार करण्यात यावा.

सविस्तर प्रकल्प अहवाल हा माहिती नियंत्रण प्रणाली (MIS), चा भाग असेल. यामध्ये भूपृष्टीय माहिती प्रणालीने विविध स्तर दर्शवून प्रकल्पाचे संनियंत्रण, व्यवस्थापन, लेखा तपशील व विश्लेषणात्मक साधन संदर्भासह नमूद करावेत,सदरचा तपशील हा राज्य स्तरीय नोडल अभिकरण व राष्ट्रीय पर्जन्याधारित क्षेत्र प्राधिकरण यांना त्यांच्या माहितीशी जोडून माहितीस्त्रोत म्हणून वापरात येईल. सविस्तर प्रकल्प अहवालात ध्येय, हेतू, प्रकल्पाचे निष्कर्ष, आव्हाने व प्रगतीविषयक मोजता येण्याजोग्या बाबी यांचा समावेश करून करण्यात यावा.

प्रत्येक पाणलोटाचे विशिष्ट गुणधर्म आणि प्रश्न आहेत.म्हणून त्यांचे संस्करण आणि व्यवस्थापन यासाठी क्षेत्रास्थित मुद्यांचा काळजीपुर्वक विचार करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रदेशवर्णन, मृदा अच्छादनाचे स्वरूप व खोली, खडकांचा प्रकार, जमिनीची जलधारण क्षमता, पावसाची तीव्रता, जमिनीचा वापर इत्यादीचा समावेश आहे. पाणलोट क्षेत्रामध्ये स्थानिक मागणी आणि सामाजिक-आर्थिक परिस्थिती यांबरोबरच वरील बाबींचा विचार करून सर्व कामांचे स्थळपरत्वे नियोजन करणे महत्वाचे आहे.

प्रकल्प अहवालामध्ये **“ माथा ते पायथा ”** या संकल्पनेचा पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणी करिता स्विकार करणे आवश्यक आहे.

**नेट प्लॅनिंग करणे**

नेट प्लॅनिंगचे काम सहभागी ग्रामीण मुल्य (PRA) पध्दतीने करावे. याकरीता पाणलोटामध्ये प्रत्येक सर्व्हे नंबरनिहाय पाहणी करुन ग्रामस्थांच्या सहभागाने तसेच संबंधित शेतक-यांच्या संमतीने व खात्याच्या मार्गदर्शक सूचनानूसार (पाणलोट क्षेत्र विकास मार्गदर्शिका) सर्व्हेनंबर निहाय तांत्रिक दृष्टया पाणलोटाचे आवश्यक ते उपचार प्रस्तावित करण्यात यावेत. व त्याचे सविस्तर अंदाजपत्रक खात्याचे मार्गदर्शक सुचनानुसार करण्यात यावे. सध्या मंजूर असलेले आर्थिक व तांत्रिक मापदंडानूसारच उपचार प्रस्तावित करावेत. व त्याकरीता पाणलोट विकास पथकाचे सहाय्य घेण्यात यावे. भविष्यात आर्थिक व तांत्रिक मापदंड बदलल्यास त्यानूसार प्रकल्प आराखडा सुधारीत करुन त्यास मान्यता मिळाल्यानंतरच त्यानूसार पाणलोट विकासाची कामे करता येतील.

क्षेत्रिय उपचार अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम देणेत यावा.

- क्षेत्र उपचाराची कामे प्रथम हाती घेणेत यावीत.
- त्यानंतर मधल्या भागातील कामे हाती घेणेत यावीत.
- शेवटी ओघळ नियंत्रणाची कामे हाती घेणेत यावीत.

पहिला टप्पा म्हणजे माथ्याकडील जंगलाच्या भागाकरिता एक बहुस्तरीय संकल्पना असेल किंवा जंगले हीच प्रत्यक्षात पाण्याचे उगमस्थान आहेत म्हणून असे क्षेत्र शोधून काढुन सर्व प्रथम, जेथे शक्य असेल तेथे वरच्या पाणलोट क्षेत्रातील वनक्षेत्र व डोंगराळ प्रदेश , केंद्र शासनाचे पर्यावरण व वन मंत्रालय किंवा राज्याचे वन विकास कार्यक्रम किंवा इतर निधी, यांच्या मदतीने योग्य उपचार केल्यानंतर, पाणलोट

क्षेत्रांचा कठीण भाग उपचारित होईल.वन जमिनीची धूप व अवनती थांबवण्यासाठी वन विभागाने चेक डॅम, समपातळी बांध (कंटूर बंड) इ. सारखे उपचार राबविलेमुळे प्रत्यक्षात खालच्या स्तराला फायदा होईल. अशा प्रकारे, बहुतेक करून डोंगराळ आणि वन क्षेत्र असलेल्या वरच्या क्षेत्रांमध्ये अंमलबजावणीची जबाबदारी मुख्यतः वन विभाग आणि संयुक्त वन व्यवस्थापन समिती (JFMC) यांच्यावर असेल.

दुसरा टप्पा म्हणजे पाणलोटाचा मधला भाग किंवा उतार, जो कृषि जमिनींच्यावर असतो. मधल्या उतारावर पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन संकल्पना, उपचार, पिकांचे स्वरूप, फळझाड लागवड, वन शेती इ. उपचार राबवावेत.

तिसरा टप्पा म्हणजे सपाट क्षेत्राचा भाग, जेथे शेतकरी शेती करतात, तेथे मजुरांना जास्तीत जास्त काम मिळेल या गोष्टीकडे लक्ष केंद्रीत केले जाईल. या भागात कमी खर्चाचे मुलस्थानी मृद व जलसंधारणाचे उपचार राबविणेत यावेत. सदर उपचार राबविलेमुळे मुलस्थानी मृद व जलसंधारणाच्या पध्दतीमुळे सर्व क्षेत्रावर पावसाचे पाणी अडवून जमिनीमध्ये मुरविल्यामुळे जमिनीतील ओलावा दिर्घकाळ टिकून पिकांच्या संवेदशनशील अवस्थेमध्ये या ओलाव्याचा उपयोग पिकांना होत असल्याने सुमारे २०-२५ टक्के अधिक उत्पादन मिळणे शक्य आहे. यामध्ये

१. समतल मशागत व पेरणी
२ मृतसरी उघडणे / जलसंधारण सरी
३ आंतरमशगतीची कामे पुर्ण झाल्यानंतर काढलेली सरी
४ जैविक बांध
५ सरी वरंबा व बंदीस्त सरी
६ रुंद वरंबा व सरी
७ बंदीस्त वाफे/ कंपार्टमेंट बंडीग
८ झाड वर्गीय पिकासाठी वर्तुळाकृती बांध, अर्धचंद्राकृती बांध व व्ही आकाराचे बांध.
९ आच्छादनाचा वापर
१० आंतरपिके/ मिश्रपिके/ पट्टापिक पध्दत
११ विहिर पुनर्भरण
१२ वनराई बंधारे/ कच्चे बंधारे.

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या पाणलोट प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल

तयार करणेसाठी स्वतंत्र सुचना निर्गमित करणेत येतील. वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनाच्या भु संसाधन

विभाग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या प्रपत्राचा(**AAP1 to AAP 44)** वापर करुन तयार करुन त्यास जिल्हा पाणलोट विकास युनिट व जिल्हा नियोजन समिती यांची मान्यता घेवुन वसुंधरा राज्यस्तरिय पाणलोट विकास युनिटकडे पाठविणेत यावा..

www.mahaagri.gov.in

**सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे :-**

समाविष्ट उपचारांचे सविस्तर अंदाजपत्रक करुन त्यास प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेकडील सक्षम अधिका-यांची तांत्रिक मान्यता घ्यावी व भौतिक व आर्थिक गोषवारा प्रकल्प अहवालात विहीत प्रपत्रात समाविष्ट करावा. मंजूर सविस्तर अंदाजपत्रकाच्या प्रति कार्यालयात जतन करुन ठेवाव्यात. व प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर त्यानुसार क्षेत्रीय कामाची अंमलबजावणी करावी. त्यात अग्रक्रमाने क्षेत्र उपचारावर भर द्यावा. प्रकल्प आराखडा तयार करताना प्रकल्प आराखडयामध्ये पाणलोटाचे मूलभत सर्वेक्षण तसेच झालेली बाबनिहाय कामे व त्यावरील खर्चाचा तपशील आणि प्रस्तावित बाबनिहाय कामे व त्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेचा गोषवारा विहीत प्रपत्रामध्ये देणेत यावा. तसेच सर्वेक्षण करणेसाठी ‘‘टोटल स्टेशन’’ सारख्या उपकरणाचा वापर करणेत यावा.

**तांत्रिकदृष्टया परिपूर्ण आणि उच्च प्रतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाची (PIA) आहे.**

तांत्रिकदृष्टया परिपूर्ण आणि उच्च प्रतीचा सविस्तर प्रकल्प अहवालास ग्रामसभेत मान्यता घेणेत येईल.त्यानंतर प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण सविस्तर प्रकल्प अहवाल जिल्हा पाणलोट विकास युनिट यांना मान्यतेसाठी सादर करील.

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी स्वंयसेवी संस्थांचीसुध्दा मदत घेणेत येईल. तसेच संस्था नियुक्तीच्या अटी व शर्ती याबद्दल स्वंतत्ररित्या कळविणेत येईल. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रती हे रु. ५२/- दर निश्चित करणेत आला आहे.सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी येणारा खर्च हा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी उपलब्ध असलेल्या प्रकल्प किंमतीच्या १ टक्के निधीतुन करणेत यावा.

केंद्रिय भुसंसाधन विभागाने विहीत केलेल्या वार्षिक कृती आराख़ड्यातील **(AAP)** प्रपत्रांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी उपयोग करावा. **तसेच प्रकल्प अहवाल दिलेल्या प्रपत्रात प्रकरणनिहाय तयार करणेत यावा.** त्यानुसार प्रकल्प पुस्तिकेची बांधणी करावी. डी.पी.आर. तयार करतांना वर नमूद केल्यानूसार नेट प्लॅनिंगव्दारे प्रत्येक सुक्ष्म पाणलोटाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करुन ग्राम सभेसमोर चर्चा करुन त्यास मान्यता घ्यावी. सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी चांगल्या प्रतीचा ए-४ साईजचा पेपर वापरावा. लिखानासाठी **१२** फाँटसाईजचा **Arial** फाँट वापरावा. सविस्तर प्रकल्प अहवालाच्या १० प्रती पुढील कार्यालयासाठी तयार करण्यात याव्यात. १) पाणलोट समिती स्तर २) प्रकायस्तर ३) जिल्हा पाणलोट विकास युनिट स्तर ४) विभागीय स्तर ५) आयुक्तालय स्तर ६) शासनस्तरावरील जल संधारण विभाग ७) अतिरिक्त प्रती-३

पाणलोटाचे सर्वेक्षण व प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम स्वंयसेवी संस्थे मार्फत करण्यात येणार असल्यास प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम खात्याचे मार्गदर्शनाखाली काम करुन घ्यावे. बाहय यंत्रणेमार्फत करण्यात येणाया सवेक्षण अहवालामधील त्रुटींची पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी संबधित संस्थेची राहील.

www.mahaagri.gov.in

# सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे वेळापत्रक.

| अ.क्र. | तपशिल | कालमर्यादा ( पाणलोट प्रकल्प मंजुरी आदेशाच्या तारखेपासुन) | जबाबदार यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे | ३ महिने | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा |
| २ | सविस्तर प्रकल्प अहवाल जिल्हा पाणलोट विकास युनीटला सादर करणे | १ आठवडा | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा |
| ३ | सविस्तर प्रकल्प अहवालाचे मुल्यमापन करणे | १ महिना | जिल्हा पाणलोट विकास युनीट |
| ४ | सविस्तर प्रकल्प अहवाल जिल्हा नियोजन समितीला सादर करणे | १ महिना | जिल्हा पाणलोट विकास युनीट |
| ५ | सविस्तर प्रकल्प अहवाल वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेला सादर करणे | १ आठवडा | जिल्हा पाणलोट विकास युनीट |
| ६ | सविस्तर प्रकल्प अहवालास वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा व भु संसाधन विभागाच्या प्रतिनिधी समवेत मान्यता देणे | १ महिना | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| ७. | सविस्तर प्रकल्प अहवालावर आधारित वार्षिक कृती आराखडा तयार करुन जिल्हा पाणलोट विकास युनीट मार्फत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेस सादर करणे | २ महिने | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा |
| ८. | सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देवुन केंद्र शासनाच्या भु संसाधन विभागास सादर करणे | १ महिना | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| ९ | सविस्तर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाच्या भु संसाधन विभागाची संमती | १ महिना | केंद्र शासनाचा भु संसाधन विभाग |

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाच्या वेगवेगळ्या समितीच्या बैठकांना संबधीत यंत्रणेच्या जिल्हा प्रमुख, उपविभागीय अधिकारी व तालुकास्तरीय अधिका-यांनी उपस्थित रहावे.

**पाणलोटातील कामांचा टप्पा : (Watershed Works Phase)**

हा टप्पा कार्यक्रमाचा आत्मा असून यामध्ये सविस्तर प्रकल्प अहवालाची अंमजबजावणी करण्यात येईल. खात्याने मंजूर केलेल्या उपचारांचा समावेश प्रकल्प आराखडयामध्ये करावा.सदर उपचारांचे मंजूर तांत्रिक व आर्थिक मापदंड विचारात घ्यावेत.

या कार्यक्रमात निवडलेल्या पाणलोटातील कामे करण्यासाठी शासन निर्णय नियोजन विभाग दि.१६/०७/२००७ अन्वये निश्चित केलेले मृद व जलसंधारणाचे तांत्रिक मापदंड व जलसंधारण विभागाच्या दि.११.०४.२००८ च्या शासन निर्णयानुसार मशिनने काम करण्याचे मंजूर आर्थिक मापदंड लागू राहतील.

www.mahaagri.gov.in

## या टप्प्यातील महत्वाचे समाविष्ट उपक्रमः

### I. अभियांत्रिकी उपचार

क. भूपृष्ठावरील अवधावाचे प्रमाण आणि वेग कमी करणेसाठी वन व सार्वजनिक क्षेत्रावरील भूआच्छादनाचे पुनर्निर्माण करणेसाठी खालील उपक्रम हाती घेणेत यावेत.

**अ. बिगर वहिती क्षेत्रावरील उपचार**

१) वनिकरण व कुरण विकास,

२) सलग समतल चर

३) खंडित चर,

४) वनतळी

५) पाय-यांची मजगी इ.

६) पडिक व अवनत जमिनीवरील वनिकरण योजना

७) बांधावरील वृक्ष लागवड

८) फळबाग लागवड

**ब. वहिती क्षेत्रावरील उपचार**

१) समतल मशागत

२) मजगी

३) फळबाग लागवड

४) कंपार्टमेंट बंडीग

५) चिबड जमिन सुधारणा

**क. ओघळ/ नाला नियंत्रणाचे उपचार**

- **अप्पर रिचेस**

**१.** जैविक बांध

**२.** अनघड दगडी बांध ( ५.०० हे पर्यंत)

- **मिडल रिचेस**

**१)** अनघड दगडी बांध ( ५.०० – १०.०० हे. पर्यंत)

**२)** लहान मातीचे बांध ( अर्द्न स्ट्रॅक्चर )

**३)** गॅबियन बंधारा

**४)** शेततळे

- **लोअर रिचेस**
  1. **१.** माती नाल बांध
  2. **२.** सिंमेट नाला बांध
  3. **३.** वळण बंधारा
  4. **४.** खोदतळे
  5. **५.** गुरे प्रतिबंधक चर
  6. **६.** नाला काठाचे स्थिरीकरण

**ग.** भूजल पुनर्रभरणाचे खालील उपाय हाती घेता येतील.

१) अल्प खर्चाचे शेततळे,

२) नालाबांध,

३) चेक डॅम,

४) पाझर तलाव

**घ.** चारा, जळण व इमारती लाकूड साठी स्थानिक जातींच्या रोपवाटिका उभारणे.

**ड.** जमिनीचा विकास करणेसाठी

**१) मूलस्थानी मृद व जल संधारणाचे उपचार – उदा..**

- समतल मशागत व पेरणी
- मृतसरी उघडणे / जलसंधारण सरी
- आंतरमशगतीची कामे पुर्ण झाल्यानंतर काढलेली सरी
- जैविक बांध
- सरी वरंबा व बंदीस्त सरी
- रुंद वरंबा व सरी
- बंदीस्त वाफे/ कंपार्टमेंट बंडीग
- झाड वर्गीय पिकासाठी वर्तुळाकृती बांध, अर्धचंद्राकृती बांध व व्ही आकाराचे बांध.
- आच्छादनाचा वापर
- आंतरपिके/ मिश्रपिके/ पट्टापिक पध्दत
- विहिर पुनर्भरण
- वनराई बंधारे/ कच्चे बंधारे.
- शेतबांध,
- समतल व ढाळी बांध
- वनस्पतींची तटबंदी,व
- डोंगराळ भूप्रदेशामध्ये मजगी घालणे इ. सारख्या जलनि:सारण व्यवस्थापनाच्या उपाययोजना राबविणे.

**पाणलोट कामासाठी उपलब्ध असलेल्या प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के निधीमधुन राबविण्यात**

www.mahaagri.gov.in

**येणा-या उपचारासाठी खर्च करणेत यावा.**

## 2. मत्ता नसणा-या व्यक्तींकरिता उपजीविका कार्यक्रम

१. दुग्धव्यवसाय

२. परसबागेतील कुकुटपालन

३. शेळी/मेंढी पालन

४. पापड/लोणचे तयार करणे.

५. चटणी/मसाले विक्री

६. केरसुणी/ झाडु तयार करणे

७. फळे/भाजीपाला विक्री

८. छोटा वाहतुक व्यवसाय

९. आंळबी उत्पादन

१०. चर्मकार व्यावसाय

११. सुतार काम

१२. कृषि विषयक सेवा पुरविणे

१३. संगणक प्रशिक्षण

१४. मोबाईल दुरुस्ती इ.

१५. मासेमारी/ विक्री

१६. घायपतापासुन दोरखंड बनविणे.

**या कार्यक्रमासाठी पाणलोट प्रकल्पाच्या १० टक्के तरतुद उपलब्ध आहे.**

## 3. उत्पादन पध्दती व सूक्ष्म उद्योजकता

१. बिजोत्पादन

२. कोरडवाहु फळबाग लागवड

३. कृषि वानिकी

४. बांधावर वृक्ष लागवड

५. फळबाग लागवड

६. कुरण/गवताची लागवड

७. वृक्ष लागवड

८. औषधी व सुगंधी वनस्पती लागवड

९. पुष्पोत्पादन

www.mahaagri.gov.in

१०. भाजिपाला लागवड

११. हरितगृहातील भाजिपाला/भाजीपाला लागवड

१२. चारा व जळावु लाकुड वनस्पती लागवड

१३. रेशिम उत्पादन

१४. मधु मक्षिका पालन

१५. आळंबी उत्पादन

१६. दुग्धव्यवसाय

१७. शेळी/मेंढी पालन

१८. मस्त्यपालन

१९. कुकुटपालन

२०. गांडुळखत निर्मिती

२१. कृषिवर आधारित छोटे उद्योग उदा. दाल मिल, बियाणे प्रमाणीकरण, बियाणे विक्री, रा. खते विक्री,किटकनाशक विक्री,पत पुरवठा, कृषि विस्तार सेवा पुरविणे,रोपवाटिका व्यवसाय,शेती औजारे पुरवठा/ भाड्याने देणे,थ्रेशर भाड्याने देणे इ.

२२. दुध संकलन/वाहतुक

२३. कृषि मालाची वाहतुक/विक्री

२४. फळ प्रक्रिया

२५. पशु चिकित्सा सेवा देणे.

२६. इमु पालन

२७. मत्स्यव्यवसाय/ मत्स्यपालन

२८. जैव इंधन लागवड

इ. उपक्रम राबवावेत.

**या कार्यक्रमासाठी पाणलोट प्रकल्पाच्या १३ टक्के तरतुद उपलब्ध आहे.**

### ८.३ एकत्रिकरण व प्रत्यावर्तन टप्पा : (Consolidation Phase & Withdrawal Phase)

या टप्प्यामध्ये दुस-या टप्प्यात निर्माण केलेली साधनसंपत्ती व केलेले अर्थिक नियोजन , निसर्गावर आधारित शाश्वत आणि उत्पादकतेचे प्रमाण वाढविण्यासाठी खालील गोष्टी हाती घ्याव्यात.

**१. विविध कामांचे एकत्रीकरण करणे.**

**क.** प्रत्येक उपचाराच्या स्थितीचे सविस्तर विवेचन असणारा प्रकल्प पूर्णत्वाचा अहवाल तयार करणे.

**ख.** भविष्यकालिन वापराकरिता यशस्वी अनुभव (माहिती) जतन करणे.

www.mahaagri.gov.in

**२. विकसित केलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन करणे.**

**क.** प्रकल्पाखालील विविध उपचाराच्या शाश्वततेत सुधारणा करणे.

**ख.** सार्वजनिक मालमत्ता साधनांवरील (CPRs) उपभोक्ता अधिकारांचे रीतसर वाटप करणे.

१. मासेमारी करणेचा अधिकार ( मत्स्यबीज सोडणे, मासेमारी करणे व विक्री करणे.)

२. घरगुती कारणास्तव जळावु लाकुड गोळा करणेचा अधिकार

३. जनावरे चारणेचा अधिकार

४. गौण वन उत्पादने गोळा करणे व विक्री करणेचा अधिकार

५. सामाईक मालमत्तेतुन रस्ता देणेचा अधिकार

६. वैयक्तीत मालमत्तेला जोडणारा रस्ता तयार करणेसाठीचा अधिकार

७. वाळु व खनिजे गोळा करणे व विक्री करणेचा अधिकार

८. पोयटा माती रोपवाटिका व लागवडीसाठी गोळा करणेचा अधिकार

९. इमारती लाकुड घर बांधणेसाठी गोळा करणेचा अधिकार

१०. पिणेसाठी पाण्याचा वापर करणेचा अधिकार

११. शेतीला पाणी देणेसाठी वापर करणेचा अधिकार

१२. वरील अधिकाराशिवाय इतर अधिकार

**ग.** सार्वजनिक मालमत्ता साधनांसाठी (CPRs) उपभोक्ता आकार गोळा करणे उदा. सिंमेट बंधारा बांधलेमुळे शेजारच्या शेतक-याना झालेल्या फायद्याच्या बदल्यात ठराविक रक्कम प्रत्येक वर्षी जमा करुन पाणलोट विकास निधीत जमा करणे.

**घ.** सार्वजनिक मालमत्ता साधनांची दुरूस्ती, देखभाल व संरक्षण करणे.

**ड.** विकसित नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत वापर करणे.

वरील बाबी पुर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत/तत्सम संस्था यांचा (नियामक मंडळ म्हणून) सहभाग घेणेत यावा.

**३. शेती उत्पादन पध्दती/बिगर शेती उपजीविकांचे सक्षमीकरण**

**क.** प्रकल्पांतर्गत फिरता निधी व बाहय संस्थांकडून मिळालेला पतपुरवठा जमा करणे.

**ख.** कृषि-संस्करण, उत्पादनाची पणन व्यवस्था , बिगर शेती व असंगठित विभागातील उद्योगांना प्रोत्साहन देणे.

**ग.**कीटकनाशक विरहित कृषि व्यवस्थापन, कमी खर्चिक सेंद्रिय शेती, बीजोत्पादन केंद्र विकसित करण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन देणे.शेतमालास स्पर्धात्मक दर प्राप्त करण्यासाठी मोठया बाजारपेठांशी संपर्क साधणे.

www.mahaagri.gov.in

**४. प्रकल्प व्यवस्थापनाशी संबंधित बाबी**

**क.** लोकसहभागातून नियोजन, कार्यान्वयन व संनियंत्रणाची कार्ये पार पाडणे.

**ख.** अपेक्षित उत्पन्नांनुसार प्रकल्पाचे मूल्यांकन करणे.

आर्थिक उपक्रमांना सहाय्यभूत करण्यासाठी गाव समूह स्तरावर संघाची निर्मिती जेणेकरुन ज्ञान, पतपुरवठा, निविष्ठा प्रापन, स्थानिक उत्पादनाची विक्री, निर्यातीच्या ठिकाणी प्रक्रिया उपक्रम चालू करण्यासाठी बाहय संस्थाबरोबरचे संबंध बळकट करणे. यामध्ये बँकेशी संबंधित उपक्रमांचा समावेश सुध्दा असेल. स्थानिक स्तरावरील पाणलोट समिती, स्वंयसहाय्यता गट व उपभोक्ता गट सक्षम करणे, ज्यामुळे प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणास बाहेर पडणे शक्य होईल.

पाणलोट समिती (WC), टप्पा दोन मध्ये निर्माण केलेल्या संरचनांची दुरूस्ती व देखभाल यांकरिता पाणलोट विकास निधीचा वापर करेल.

**उपभोक्ता वर्गणी :**

ग्रामसभा, पाणलोट समितीच्या (WC) मार्फत उपभोक्ता वर्गणी गोळा करण्याकरिता कार्यपध्दती तयार करेल. **भूमिहीन, निराश्रित किंवा विकलांग/कुटुंब प्रमुख विधवांकडून खाजगी किंवा सार्वजनिक जमिनीवर केलेल्या कामाकरिता कोणतीही वर्गणी घेण्यात येणार नाही**.उपभोक्ता वर्गणी रक्कम पाणलोट विकास निधीत (WDF) जमा करुन तीचा वापर प्रकल्प काळात तयार झालेल्या साधनांच्या देखभालीसाठी करणेत येईल.

**पाणलोट विकास निधी : (WDF)**

पाणलोट प्रकल्पाकरिता गावांच्या निवडीसाठी आवश्यक असणा-या अटींपैकी एक अट म्हणजे पाणलोट विकास निधीसाठी लोकवर्गणी ही आहे. पाणलोट विकास निधीची वर्गणी ही फक्त खाजगी जमिनींवर नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामांच्या खर्चाच्या किमान १० टक्के इतकी घ्यावी. तथापि अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, लहान व अल्प भू-धारक शेतकरी यांच्या बाबतीत ही वर्गणी त्यांच्या जमिनीवर नैसर्गीक साधनसंपत्ती व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामाच्या खर्चाच्या ५ टक्के इतकी घ्यावी. पाणलोट विकास निधीची वर्गणी पाणलोट समितीच्या (WC) बँक खात्यापेक्षा वेगळे असलेल्या खात्यात जमा करावी. पाणलोट विकास निधीचे (WDF) बँक खाते ग्रामपंचायत अध्यक्ष (सरपंच) व ग्रामसभेने नामनिर्देशित केलेला स्वयंसहायता गटाचा कोणताही सदस्य यांनी हाताळावे. असा निधी हाताळण्यासाठी पाणलोट समिती (WC) एक नियमावली तयार करेल व त्यास ग्रामसभेची मान्यता घेईल. पाणलोट विकास निधीचे व्यवस्थापन व वापरासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना सविस्तरपणे स्वतंत्ररित्या देणेत येतील. **पाणलोट समितीचा सचिव, पाणलोट विकास निधीच्या जमा खर्चाचा पूर्णपणे स्वतंत्र लेखा ठेवेल. पाणलोट प्रकल्प पुर्ण झालेनंतर सदरचे खाते संबधीत ग्रामपंचायतकडे वर्ग करावे.**

ही वर्गणी एकतर सदर कामाच्या अंमलबजावणीच्या वेळी रोख रकमेच्या स्वरूपात किंवा स्वच्छेने केलेल्या मजुरीच्या स्वरूपात स्वीकारली जाईल. स्वेच्छेने केलेल्या मजुरीच्या मूल्याइतकी रक्कम पाणलोट प्रकल्प खात्यातून

www.mahaagri.gov.in

पाणलोट क्षेत्र विकास निधी खात्यामध्ये  हस्तांतरित करण्यात येईल. सामाईक साधनसंपत्तीमध्ये निर्माण केलेल्या मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न व उपभोक्ता वर्गणी, पाणलोट विकास निधीच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

तथापि,जलसंवर्धन,फलोत्पादन,कृषि-वनशेती, पशुसंवर्धन इत्यादी सारखे शेती पूरक व्यवसाय खाजगी जमिनीवर राबवून त्याचा थेट वैयक्तिक स्वरूपात शेतक-यांना लाभ होत असेल तर, सर्वसाधारण वर्गाच्या शेतक-यांकरिता ४० टक्के इतकी वर्गणी व उपक्रमाचा उर्वरित ६० टक्के खर्च प्रकल्प निधीतून मिळेल. तर अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थीकरिता २० टक्के इतकी वर्गणी असेल व उपक्रमाचा उर्वरित ८० टक्के खर्च हा प्रकल्प निधीतून मिळेल. मात्र कोणत्याही बाबतीत ही रक्कम पाणलोट विकास प्रकल्पाच्या प्रमाणित एकक खर्च मापदंडाच्या दुप्पट म्हणजेच र.रु.२४०००/- इतकी असेल.

पाणलोट  विकास निधीतील ५० टक्के रक्कम प्रकल्पांतर्गत सामाईक जमिनीवर निर्माण झालेल्या मत्तेच्या देखभालीसाठी किंवा सामाईक वापरासाठी राखून ठेवावी.  **खाजगी जमिनीवर हाती घेतलेली कामे, या निधीतून दुरूस्ती व देखभाल करण्याकरिता पात्र असणार नाहीत.** उर्वरित रक्कम फिरता निधी म्हणून वापर करण्यात यावा. ज्या गावक-यांनी निधीमध्ये वर्गणी दिली आहे अशा प्रकल्प क्षेत्रातील गावक-यांना अशा फिरत्या निधीमधून आगाऊ  कर्जे देता येतील. तसेच वैयक्तीक त्याचबरोबर धर्मादाय संस्थांना या निधीमध्ये उदारपणे योगदान करण्यासाठी उत्तेजन देण्यात यावे.

## ९. पाणलोट प्रकल्पांना मंजुरी व निधी वितरण :

### पाणलोट विकास प्रकल्पांना मान्यता व मंजुरी

प्रत्येक वर्षी फेब्रुवारीच्या शेवटी, राज्यातील चालू उपक्रम तसेच  हाती घ्यावयाचे नवीन प्रकल्प दर्शविणारा तपशिलवार वार्षिक कृती आराखडा केंद्राला सादर करेल.  त्यानंतर केंद्रीय स्तरावरील संबंधित मंत्रालय वर्षाकरिता उपलब्ध असलेल्या एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीच्या आधारे व पाणलोट निवडीच्या निकषांच्या आधारे प्रस्ताव केंद्र शासनास पाठवेल. त्याआधारे प्रत्येक राज्याकरिता विशिष्ट रकमेचे वाटप केंद्र शासन करेल. राज्याला चालू व नवीन प्रकल्पांसाठी निधी मिळाल्यानंतर, राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा निधी उपलब्धतेनुसार राज्यांतर्गत  प्रकल्पांना  प्राधान्यक्रमानुसार मान्यता देईल. राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेकडून नवीन प्रकल्पांकरिता मंजुरी आदेश संबंधित मंत्रालयास मिळाल्यानंतर, संबंधित मंत्रालयाकडुन निधींचे वितरण राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेला करेल. त्यानंतर प्राप्त निधीचे वितरण जिल्हा पाणलोट विकास युनीटला करणेत येईल. जिल्हा पाणलोट विकास युनिटकडून प्राप्त निधीचे वाटप प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा व पाणलोट समितीला १५ दिवसाचे आत करेल.

www.mahaagri.gov.in

**पाणलोट प्रकल्पातील विविध घटकांकरिता तरतुदीचे वाटप**

| **अ.क्र.** | **अर्थसंकल्पीय घटक** | **वाटप टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय खर्च | १० |
| २ | संनियंत्रण | १ |
| ३ | मूल्यमापन | १ |
| | **पूर्व तयारी टप्पा :** | |
| ४ | प्रेरक प्रवेश उपक्रम | ४ |
| ५ | संस्था व क्षमता बांधणी | ५ |
| ६ | सविस्तर प्रकल्प अहवाल | १ |
| | **पाणलोट कामांचा टप्पा :** | |
| ७ | पाणलोट विकास कामे | ५० |
| ८ | मत्ता नसणा-या व्यक्तींकरिता उपजीविका कार्यक्रम | १० |
| ९ | उत्पादन पध्दती व सूक्ष्म उद्योजकता | १३ |
| **१०** | **एकत्रीकरण टप्पा :** | ५ |
| | **एकूण** | **१००** |

प्रकल्पाच्या विविध घटकांवरील खर्च हा खालील शर्तीच्या अधीन राहुन करणेत यावा.

१. पाणलोट विकास पथकाचे सदस्य/पाणलोट समितीचा सचिव इत्यादी च्या वेतनावरील खर्च केवळ प्रशासकीय खर्च घटकातून करण्यात येईल.

२. प्रकल्प खर्चाच्या प्रत्येक घटकातील तरतुदीनुसार खर्च करण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत बचत झाल्यास वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणेच्या मान्यतेने ती फक्त पाणलोट कामांकरीताच वापरता येईल.

३. **वाहन व इतर उपकरणेची खरेदी आणि इमारत बांधकाम** यावर खर्च करता येणार नाही.तथापि संगणक खरेदी व त्यासंबंधीचे सॉफ्टवेअर खरेदी करण्यास परवानगी आहे.

४. जन जागृती व क्षमता निर्माण उपक्रमासाठी संलग्न विभागाच्या प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा, स्वयंसेवी संस्था(VoS)/समाज संघटन संस्था (CBOs) या यंत्रणांचा बाह्यवापर(Outsourcing) करून घेवु शकतील.

**एप्रिल २००८ पासुन पाणलोट क्षेत्र विकासाकरिता प्रती हेक्टर मापदंड रू.१२०००/- मंजुर आहे.**

**केंद्र शासनाकडुन निधी वितरणाची कार्यपध्दती :**

केंद्र शासनाच्या निधीचा हिस्सा हा प्रकल्प कालावधीतील ३ हप्त्यात राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा / जिल्हा पाणलोट विकास युनिट यांना खालील पध्दतीनुसार किंवा भुसंसाधन (नोडल) मंत्रालयाने निश्चित केल्यानुसार वितरित करण्यात येईल.

१) **पहिला हप्ता** केंद्र शासनाच्या हिश्याच्या **२० टक्के** निधी राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेकडुन पाणलोट प्रकल्पाला मंजुरी मिळाल्यानंतर **पुर्वतयारी टप्प्यातील उपक्रमांसाठी** देण्यात येईल.

२. **दुसरा हप्ता** प्रकल्प किंमतीच्या केंद्र शासनाच्या हिश्याच्या **५० टक्के** निधी, पहिल्या हप्त्याच्या रकमेपैकी ६०

www.mahaagri.gov.in

टक्के रक्कम खर्च केल्यानंतर व योग्य ते प्रमाणपत्र आणि पुर्वतयारी टप्प्यातील कामे पूर्ण केल्याची कागदपत्रे सादर केल्यावर **प्रकल्पातील कामे** करणे करिता देण्यात येईल.

३. **तिसरा हप्ता** एकूण देण्यात आलेल्या निधीपैकी ७५ टक्के इतका निधी खर्च केल्याचे योग्य प्रमाणित केल्यानंतर व त्याच्या पुष्टिकरणाकरिता संबंधित कागदपत्रे सादर केल्यानंतर केंद्र शासनाच्या हिश्याच्या उर्वरित **३० टक्के** निधी पैकी २५ टक्के निधी पाणलोट क्षेत्र कामाकरिता देण्यात येईल. उर्वरित ५ टक्के निधी हा एकत्रिकरणाच्या टप्प्याकरिता देण्यात येईल.

केंद्र शासनाच्या निधी बरोबरच राज्य शासनाचा हिस्स्याचा १० टक्के निधी प्रत्येक टप्प्यावर वितरित केला जाईल.

**केंद्र शासनाकडुन निधीचे वितरण**




**जिल्हा पाणलोट विकास युनिटला निधी प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा व पाणलोट समिती यांना निधीचे वितरण करणे बंधनकारक राहील.**

**निधीचे वितरण.**

१. जिल्हा स्तरावर जिल्हा पाणलोट विकास युनिट यांचे खात्यात निधी वितरीत करण्यात येईल.

२. प्रकल्प कार्यान्वय अभिकरणाने पाणलोट समित्याकडून पुढील तीन महिन्याकरीता करावयाच्या कामाचा आवश्यक निधीची मागणी घेऊन एकत्रित करुन शिफारशीसह जिल्हा पाणलोट विकास युनिट कडे सादर करावी. सदरची मागणी सादर करतेवेळी संस्थेच्या खात्यातील शिल्लक रक्कम, झालेली कामे व शिल्लक कामे याचा विचार करुन अभिप्राय द्यावेत.

३. जिल्हा पाणलोट विकास युनिट यांनी प्राप्त मागणी व उपलब्ध निधी याचा विचार करुन पाणलोट प्रकल्प आराखड्यानुसार निधीचे वितरण थेट प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा व पाणलोट समितीच्या बॅक खात्यावर जमा करावा.

४. प्रशासकीय खर्चासाठी उपलब्ध असणा-या १० टक्के निधीपैकी १ टक्का निधी पाणलोट समितीला व ९ टक्के निधी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेला प्रशासकीय खर्चासाठी जिल्हा पाणलोट विकास युनिट वितरित करेल.

**देयक अदा करणेची पध्दत-.**

प्रत्येक पाणलोटात पाणलोट समितीमार्फत करण्यात येणा-या कामाची देयके संबंधीत शेतकरी, मजुर, फुटकळ ठेकेदार व मशिनधारक यंत्रणा इत्यादींना बॅकामार्फत रेखांकीत धनादेशाद्वारे ( क्रॉस चेकद्वारे ) अदा करण्यात यावीत. देयक पाणलोट समितीने प्रमाणित करावे. प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेच्या पणलोट विकास पथकातील सदस्याने मापन पुस्तिकात झालेल्या कामाची नोंद करावी. त्यानंतर पर्यवेक्षीय अधिकारी यांनी त्यांना विभागाने नेमुन दिल्या प्रमाणे पगारपुर्व तपासणी काम पुर्ण झाल्यापासुन आठ दिवसांचे आत करुन मापनपुस्तिक व हजेरीपट पाणलोट विकास पथकास सुपुर्त करावी. पाणलोट विकास पथकाने तपासणी अहवाल पाणलोट समितीला ८ दिवसात अदायगीसाठी द्यावा तथापि ही सर्व प्रक्रिया मोजमापे घेतल्यानंतर १५ दिवसांत पुर्ण करणेत अनिवार्य राहिल..

**प्रकल्प मध्येच बंद करणे :**

प्राधिकारी व सहभागी समूहाचा चांगला उद्देश असूनही, सविस्तर प्रकल्प आराखडा काळजीपूर्वक केलेला असूनदेखील तसेच काळजीपूर्वक संनियंत्रण करून सुध्दा काही प्रकल्पांमध्ये अशा घटना घडतात की, ज्यामुळे इतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये शैथिल्य निर्माण होते किंवा एखाद्या विशिष्ठ कामानंतर त्यामध्ये काहीही प्रगती होत नाही. अशा काही टोकाच्या प्रकल्पांमध्ये आणखी पाठपुरावा करणे म्हणजे वेळेचा, उर्जेचा व साधनसंपत्तीचा अपव्यय करणे होय. अशा वेळी शेवटचा पर्याय म्हणजे प्रकल्प पूर्णः बंद करणे. जिल्हा पाणलोट विकास युनिटकडून अनुदानाचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर ३ महिन्याच्या आत प्रकल्पाचे काम सुरू झाले पाहिजे. ही गोष्ट खर्चाच्या अहवालावरून लक्षात घ्यावी. ज्या प्रकल्पामध्ये असे शैथिल्य दिसुन येईल त्या प्रकल्पासाठीचा निधी काढून घेऊन तो निधी राज्यातील इतर प्रकल्पांचे कामाकरिता देणेत येईल.

खालील परिस्थितीमध्ये राज्य/केंद्र शासनाकडून प्रकल्प मध्येच बंद करणेकरिता कार्यवाही सूरू करणेत येईल.

www.mahaagri.gov.in

१. राज्य व जिल्हास्तरीय प्राधिका-याकडून प्रकल्पाबाबत सतत उदासीनता दिसून येणे.

२. पूर्व तयारी टप्याच्या समाप्तीनंतर दोन वर्षापर्यंत सविस्तर प्रकल्प अहवाल/मंजूर कृती आराखडा कोणत्याही सबळ कारणाशिवाय सादर न करणे.

३. प्रकल्पाशी संबंधित कोणतीही बाब न्यायप्रविष्ट असेल आणि न्यायालयाने प्रकल्पाच्या कामाकरिता स्थगिती आदेश दिला नसल्यास प्रकल्प मध्येच बंद करणेकरिता कार्यवाही सूरू करता येईल.

४. केंद्र/राज्य/जिल्हा यांनी वेळोवेळी प्रकल्प मध्येच थांबविण्याचा घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करणारे इतर कोणतेही कारणामुळे प्रकल्प मध्येच बंद करता येईल.

**क्षमता बांधणी :**

पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांमध्ये अपेक्षित परिणाम साधण्यासाठी क्षमता विकास हा एक महत्वाचा घटक आहे. पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प राबविण्यासाठी या मार्गदर्शक सूचना म्हणजे क्षमता निर्माण धोरणाचीच एक रूपरेषा आहे. राष्ट्रीय पर्जन्याधारित क्षेत्र प्राधिकरण, राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा व इतर प्रशिक्षण देणा-या संस्था यांचे बरोबर विचारविनिमय करून राज्यामध्ये क्षमता निर्माण करण्याकरिता ध्येय धोरणे निश्चित केली जातील. **राज्यामध्ये पाणलोट प्रकल्पासाठी क्षमता बांधणीची रणनिती, क्षमता बांधणी आराखडा व अभ्यासक्रम ठरविणेसाठी यशदा पुणे यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सुचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.**

**संनियंत्रण : (Monitoring)**

पाणलोट प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर नियमितपणे संनियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी ऑनलाईन संनियंत्रण हे सर्व प्रकल्पांसाठी महत्वाची बाब असेल. संनियंत्रणामध्ये प्रक्रिया व निष्कर्षाचा समावेश असले. प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा, राज्यस्तरीय नोडल अभिकरणाकडे सादर करण्यासाठी त्रैमासिक प्रगती अहवाल (पाणलोट समितीच्या अध्यक्षांची प्रतिस्वाक्षरी असलेला) पाणलोट क्षेत्र विकास युनिटकडे सादर करेल. जिल्हा पाणलोट क्षेत्र विकास युनिटमधील एका सदस्यांकडे संनियंत्रणाची संपूर्ण जबाबदारी असेल.

कार्यक्रमाचे सनियंत्रण चांगल्या प्रकारे होणेकरीता केंद्रीय भूसंसाधन विभागाने तयार केलेल्या ऑनलाईन सनियंत्रण प्रणालीचा वापर करण्यात यावा. सदरची ऑनलाईन संगणक प्रणाली भूसंसाधन विभागाच्या http://watershed.nic.in वापर करुन पाणलोट कार्यक्रमाचा त्रैमासिक प्रगती अहवाल भरावयाचा आहे. सदरची माहिती ही जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा पाणलोट विकास युनिट स्तरावर भरण्यात यावा.

**अंतर्गत संनियंत्रण –**

पाणलोट प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर नियमितपणे संनियंत्रण ठेवणेसाठी पाणलोट विकास पथक सदस्य, प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेचे संबंधीत अधिकारी/ कर्मचारी वर्गाकडुन तपासणी करणेत येईल.

**बाह्य यंत्रणेकडुन संनियंत्रण-**

प्रकल्प अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर कामाचे संनियत्रण करणेसाठी नामांकित शासकिय संस्थाची मदत घेणेत येईल.सदर संस्थेच्या माध्यमातुन पाणलोट प्रकल्पाचे संनित्रण करणेत येईल. याबाबत राज्यस्तरावरुन स्वतंत्र सुचना निर्गमित करणेत येतील.

**प्रगती सनियंत्रणः**

प्रकल्पांतर्गत वेगवेगळया पातळीवर कार्यक्रमाचा आढावा घेवून त्यावर मार्गदर्शन करण्यासाठी राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास योजना, जिल्हा स्तरावरील जिल्हा पाणलोट विकास युनिट, प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा व पाणलोट समिती स्तरावर कार्यक्रमाचा आढावा ठराविक कालावधीनंतर प्रगतीचा विशेषतः अंमलबजावणीच्या टप्प्यात प्रत्येक पातळीवर नियममितपणे आढावा घेण्यात यावा.

## १. राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणास्तरः

केंद्र शासनाचे पाणलोट विकास पथक प्रकल्पांच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनसुार राज्यस्तरावर पाणलोट विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता प्रधान सचिव (जलसंधारण) यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर यंत्रणेच्या बैठकीमध्ये एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमाच्या प्रगतीचा विशेषतः अंमलबजावणीच्या टप्प्यात नियमितपणे आढावा घेण्यात येईल.

## २. जिल्हा पाणलोट विकास युनिटस्तरः

जिल्हास्तरावर एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा पाणलोट विकास युनिटची स्थापना केलेली आहे. सदर युनिटची बैठक प्रत्येक महिन्याला घेण्यात यावी. त्यामध्ये जिल्हा पाणलोट विकास आराखडा तसेच एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यात झालेल्या कामाचा आढावा घेण्यात यावा. जिल्हा पातळीवर दर महिन्याला प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. तसेच प्रत्येक पाणलोटाची भौतिक व आर्थिक प्रगती साधण्याच्या दृष्टीने अंमलबजावणी टप्प्यात मासिक कार्यक्रम आखून सनियंत्रण करावे.

## ३. पाणलोट समितीस्तरः

पाणलोट विकास प्रकल्पात सहभागी असलेल्या पाणलोट समितीची बैठक दर महिन्याला त्या त्या पाणलोट गावात पाणलोट समिती अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली होईल. या बैठकीत पाणलोट विकास कार्यक्रमाचा भौतिक व आर्थिक प्रगती आढावा घेण्यात यावा. पाणलोट विकास आराखडयातील कामासंबंधी चर्चा करावी. तसेच पाणलोट अंमलबजावणीत येणा-या अडथळयावर मात करावी.

**अहवाल सादर करणेः-**

पाणलोट क्षेत्र विकासाची झालेली कामे व प्रकल्पावर झालेला खर्च याबाबतची माहिती शासन विभाग तसेच ग्रामस्थ यांचेसमोर मांडणे महत्वाचे आहे. ग्राम पाणलोट समितीने आढावा घेऊन प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेस भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल विहीत प्रपत्रात खालीलप्रमाणे सादर करावा.

| कोणाकडून | कोणाकडे | प्रगती अहवाल सादर करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| पाणलोट समिती | प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा | ३ |
| प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा | जिल्हा पाणलोट विकास युनिट | ५ |
| जिल्हा पाणलोट विकास युनिट | राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा | १० |

याशिवाय झालेल्या कामाचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल विहित प्रपत्रात वर नमूद केलेल्या तारखांना वेळेत सादर करणेची दक्षता घ्यावी. अहवाल सादरीकरण करण्यासाठी केंद्र शासनाने ठरवुन दिलेल्या MIS for IWMP प्रपत्राचा वापर करुन अहवाल सादर करणेत यावेत.

**सामाजिक लेखापरिक्षणः**

समूहाच्या सदस्यातील संघर्षाचे प्रमाण कमी करावयाचे असेल तर गावपातळीवरील सामाजिक परिक्षण व पारदर्शीकता हे महत्वाचे साधन आहे. कार्यक्रम अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता राहण्यासाठी खालील प्रमाणे उपाय योजना करण्यात याव्यात.

- दिनांक २६ जानेवारी व १ जुलै या दिवशी होणा-या ग्रामसभेत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सुरु असलेल्या पाणलोट प्रकल्पाच्या भौतिक व आर्थिक साध्याबाबतची लेखी माहिती देण्यात यावी.
- दिनांक २५ जानेवारी व ३० जुन या दिवशी महिलासाठी स्वतंत्र ग्रामसभा आयोजित करुन एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सुरु असलेल्या पाणलोट प्रकल्पाच्या भौतिक व आर्थिक साध्याबाबतची लेखी माहिती पाणलोट समिती अध्यक्ष , सचिव व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या प्रतिनिधीने देण्यात यावी.
- गावामध्ये प्रमुख वैशिष्टे व दरांची प्रमाण अनुसूचीबाबतची माहिती प्रदर्शित करणे.
- पाणलोट प्रकल्पांतर्गत सहभ्ंागी लोकांकडून प्रस्ताव जमा करण्यासाठी औपचारिक अर्ज पध्दती राबविणेबाबत केलेली कार्यवाही.
- केलेल्या कामाची देयके धनादेशाद्वारे अदा केलेबाबत माहिती द्यावी.
- संबंधित उपयोगकर्त्याशी विचारविनिमय करुनच तांत्रिक अंदाजपत्रके तयार करणे तसेच कामाच्या अंमलबजावणीस सुरुवात करणे.
- पाणलोट समितीच्या सदस्यांनी वारंवार कामास भेटी देवून कामाचे सनियंत्रण करणे.

**प्रक्रिया सनियंत्रणः**

पाणलोट विकास कार्यक्रमाचे प्रत्येक टप्प्यावर सनियंत्रण होण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्हा पाणलोट विकास युनिटमधील सदस्यांनी पहिल्या वर्षी महिन्यातुन एकदा क्षेत्रिय भेटी देवून कार्यक्रम अंमलबजावणीची तपासणी

www.mahaagri.gov.in

करावी. तसेच दुस-या वर्षापासून जिल्हा पाणलोट विकास युनिट सदस्यांनी दोन महिन्यातुन एकदा क्षेत्रिय भेट देवून एकात्मिक पाणलोट विकास व्यवस्थापन कार्यक्रमाचे सनियंत्रण करावे.

कार्यक्रमाचे सनियंत्रण करण्याकरीता प्रकल्प मूल्याच्या **१ टक्के** तरतूद मंजूर आहे.

**मूल्यमापन : (Evaluation)**

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या पाणलोट प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यासंबंधातील मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमीत करण्यात येतील.

**निष्कर्ष / परिणाम : (Outcomes/End Results)**

प्रत्येक पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाने प्रकल्प कालावधीच्या शेवटी खालील प्रमाणे परिणाम साध्य करणे अपेक्षित आहे :

१. पाणलोट क्षेत्रामधील वहिताखालील व बिगर वहिताखालील जमिनींवर उपचार जल निस्सारण मार्ग, व त्यांचा विकास याकरिता आखलेली सर्व कामे/उपक्रम उपभोक्ता गट व लोकसमुहाच्या मोठया प्रमाणातील सक्रीय सहभागाने पुर्ण करणे.

२. उपभोक्ता गट/पंचायतींनी पाणलोटामध्ये निर्माण झालेल्या साधनसंपत्ती देखभालीसाठी स्वेच्छेने ताब्यात घेतली आहे. आणि तिच्या देखभालीकरिता व आणखी विकास होण्यासाठी सक्षम प्रशासन व वित्तीय व्यवस्था यासाठी केलेली उपाययोजना .

३. पाणलोट समितीचे सर्व सदस्य आणि पाणलोट सचिव यांसारख्या कर्मचारी वर्ग यांना पाणलोट क्षेत्र विकास पथक प्रकल्पातून परत गेल्यानंतर त्यांची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्याकरिता योग्य पातळीपर्यंत त्यांचे ज्ञान वाढविण्यासाठी आणि तांत्रिक/व्यवस्थापन विषयक व संस्थात्मक कौशल्य वाढविण्यासाठी उद्‌बोधक प्रशिक्षण दिले आहे.

४. बचत व इतर उत्पन्न वाढीची साधने वृध्दींगत होण्यासाठी ज्यामुळे सदस्यांमध्ये अंतर्गत सांमजस्य निर्माण होऊन त्यांच्यामध्ये अर्थिक स्वयंपूर्णता येईल, त्यासाठी गावसमूहाचे विविध एकसंघ प्रकारचे स्वयंसहयता गट तयार केलेले असणे.हंगामी स्थलांतर कमी होणे.

५. खरिप , रब्बी व उन्हाळी हंगामातील पिकाचे उत्पादनातील वाढ. पिक घनतेत वाढ.

६. प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील शेतकरी/भूमिहीन मजुरांच्या उत्पन्नात वाढ व रोजगार निर्मीतीत वाढ.

७. फलोत्पादन व औषधी वनस्पती पिकाखालील क्षेत्रात व उत्पादनातिल वाढ

८. पाणलोटातील विविध स्वरूपाच्या संरचनांमुळे जमिनीतील पाण्याचे पुनर्रभरण होऊन भूजल पातळीत वाढ होणे. तसेच पिण्याच्या पाण्याचा दर्जा सुधारणे व जास्त कालावधीसाठी उपलब्ध होणे, पाणी वापर कार्यक्षमतेत वाढ होणे

९. सामाईक मालमत्ता संपतीच्या हक्काचे वाटप करणे

१०. चारा पिकाखालील क्षेत्रात वाढ होणे.

www.mahaagri.gov.in

**११.** वनाखालील/ वनस्पतीचे आच्छादन वाढणे.

**१२.** पशुधनात वाढ होणे व दुध उत्पादन वाढणे

**१३.** शेतीपुरक लघु उद्योगात वाढ होवुन रोजगार उपलब्ध होणे.

**१४.** भुमिहिनाच्या उदर्निर्वाहाच्या उपक्रमाच्या माध्यमातुन रोजगारात वाढ होणे.

---o----o---o---o---o---o---

## जोडपत्र - अ
## जिल्हा पाणलोट विकास युनिट आणि प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण यांच्यामधील सामंजस्य करार

हा सामंजस्य करार ------------ या दिवशी ------ या महिन्यात --------- वर्षात त्यांच्याकडून आणि दोहोंच्यामध्ये करण्यात आलेला आहे. ---------------------------- (संघटनेचे नाव) यांचेकडून प्रतिनिधीत्व केलेले श्री. ---------------------- प्रकल्प संचालक म्हणून नामनिर्देशीत केलेले, यापुढे त्यांचा उल्लेख प्रकल्प कार्यान्यीन अभिकरण (PIA) असा करण्यात आलेला आहे.

यांच्या वतीने

------------------------------- या जिल्हयाच्या जिल्हा पाणलोट विकास युनिटच्या ------------- यांनी त्यांचे प्रतिनिधीत्व केले आहे आणि त्यानंतर यापुढे त्यांचा निर्देश आणि उल्लेख अभिकरण असा केला आहे, ज्या अर्थी जिल्हा पाणलोट विकास युनिटने --------------------- संघटनेला पाणलोट प्रकल्प सोपविला आणि तो प्रकल्प हाती घेण्यास संघटनेची संमती आहे.

**पाणलोट विकास पथकाची रचना.**

| अ.क्र. | पाणलोट पथक सदस्याचे नाव | अर्हता | विषय |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

टिपः- वरीलपैकी किमान एक सदस्य महिला सदस्य असावी.

**आता हया दस्तऐवजाच्या साक्षीच्या बाबी खालीलप्रमाणे असतील.**

**१.** प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाच्या वतीने संघटनेचे श्री/डॉ -------------------------- यांना प्रकल्प संचालक म्हणून नामनिर्देशित करण्यात आले आहे. जे प्रस्तुत सामंजस्य करार यंत्रणेच्या वतीने अमलात आणत

www.mahaagri.gov.in

आहे जिल्हा पाणलोट प्रकल्प युनिट बरोबर हा सामंजस्य करार करण्यासाठी प्रकल्प संचालकांना प्राधीकृत करण्यात आले आहे.

२. केवळ यंत्रणेकडून नमूद करण्यात आलेल्या अशा प्रयोजनासाठीच यंत्रणेने दिलेला निधी प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण खर्च करेल.

३. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण विविध उपक्रमावरील भौतिक आणि आर्थिक अहवाल त्रैमासिक पध्दतीने जिल्हा पाणलोट विकास युनिटला देईल.

४. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाकडून वर्षाच्या अखेरीस वार्षिक लेखे सादर करण्यात येतील जे सक्षम सनदी लेखापालाकडून प्रमाणित केलेले असतील.

५. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण पाणलोट विकास पथकातील कर्मचारी वर्गाचे नामनिर्देशन करेल.

६. या प्रकल्पाखाली पाणलोट विकास पथकाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेल्या सर्व व्यक्ती पुर्णकालिक तत्वावर असतील आणि केवळ प्रकल्पासाठीच काम करतील जेव्हा त्यांच्या सेवेची आवश्यकता असेल तेव्हा ते पाणलोट समुहासाठी उपलब्ध असतील.

७. प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण नामनिर्देशित करण्यात आलेला कर्मचारी वर्ग नवीन मार्गदर्शक सुचनांमध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांच्या आपापल्या कार्यक्षेत्रात व्यवसायदृष्टया अर्हताप्राप्त व अनुभवी असतील.

८. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण कोणत्याही अन्य कार्यक्रमाकडे निधी वळविणार नाही आणि मान्यताप्राप्त कृति आराखडा आणि मार्गदर्शक सुचनांच्या अनुसार काटेकोरपणे खर्च करेल.

९. जिल्हा पाणलोट विकास युनिट आणि पाणलोट समिती संघटीत होण्यापुर्वी प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण पुरेशा संख्येने स्वयंसहाय गट आणि उपयोगकर्ता गटाचे संघटन करेल.

१०. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण पाणलोट समिती संघटीत करेल आणि त्याची समुचित प्राधिकाराने सस्था नोंदणी अधिनियमाखाली नोंदणी करेल.

११. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण पाणलोट समितीचे संघटन झाल्यानंतर स्वयंसहायता गट आणि उपभोक्ता गट संघटनेला चालना देईल.

१२. मंजूर केलेल्या कृति आराखडयाच्या अंमलबजावणीत वेळोवेळी साध्य केलेल्या प्रगतीचे संनियंत्रण व आढावा घेण्यासाठी पाणलोट समितीच्या मदतीने वापरण्यात येणारी कार्यपध्दती देखील प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण विकसीत करेल.

१३. सामंजस्य करारावर सहया झाल्यानंतर जिल्हा पाणलोट विकास युनिट (व्यवस्थापन घटकांसंबंधात) प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाच्या बँक खात्यात आणि (विकास घटकांसंबंधात ) पाणलोट समितीच्या बँक खात्यात अर्धवार्षिक तत्वार निधी वितरीत करेल.

१४. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण कोणत्याही धार्मिक आणि राजकीय कार्यक्रमात सहभागी होणार नाही.

www.mahaagri.gov.in

१५. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण समुह संघटन आणि प्रशिक्षणाच्या समावेशासह जागरूकता, शिबिरे, अनुभव देणा-या भेटी आणि अन्य कार्यक्रमाचे आयोजन करेल. त्यानंतर यंत्रणा, सहभागी यंत्रणेमार्फत पाणलोट कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी आणि मुल्यमापनास चालना देईल.

१६. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण सहभागी होणा-याकडून आवश्यक ती उपभोक्ता वर्गणी गोळा करेल आणि ती रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत पाणलोट विकास निधीच्या नावाने जमा करेल.

१७. प्रकल्प कायन्र्वयीन अभिकरण जात, वंश, आणि धर्म विचारात न घेता सर्व समुहास सामावून घेईल.

१८. जर जिल्हा पाणलोट विकास यंत्रणा, कार्यक्रमाच्या संबंधातील प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणच्या प्रगती बाबत समाधानी नसेल किंवा प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण अटी आणि शर्तीचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास नोटिस देवून प्रकल्प रदद करण्याचा अधिकार राखून ठेवील. आणि वापरलेली व खात्यावर शिल्लक असलेली संपुर्ण रक्कम, प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण त्वरीत परत करेल.

१९. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालाच्या बाहेर जावुन निधीचा गैरव्यवहार/ अफरातफर केल्यास या घटनेस जबाबदार असलेल्यास जिल्हा पाणलोट विकास युनिट या नियमानुसार कारवाई करेल.

२०. जेव्हा प्रकल्प पुर्ण होईल तेव्हा प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण जमा आणि प्रदानाच्या लेखा परिक्षण केलेल्या लेख्यांचे विवरणपत्र सादर करेल आणि त्यासोबत सनदी लेखापालाकडून योग्य रितीने प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र जोडेल.

२१. जिल्हा पाणलोट विकास युनिटच्या अधिकारी वर्गाला केव्हाही दस्तऐवज, नस्त्या, अहवाल आणि लेखे तपासणी करण्याची मुभा असेल.

२२. प्रकल्प कार्यान्यीन अभिकरण या प्रकल्पासाठी राष्ट्रीयकृत बँकेत एक स्वतंत्र खाते उघडेल आणि त्याचा वेगळा लेखा ठेवेल.

२३. कृषि मंत्रालय आणि ग्रामीण विकास मंत्रालय यांनी संयुक्तरित्या तयार केलेल्या पाणलोट विकासाच्या सर्वसाधारण तत्वावर आधारीत भारत सरकारच्या विविध नोडल मंत्रालयानी तयार केलेल्या पाणलोट विकासासाठीच्या प्रत्यक्ष कार्यवाहीच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये घालून दिलेल्या अटी आणि शर्ती अनुसरून सामंजस्य करार बनविण्यात आणि अंमलात आणला आहे.

२४. या बाबीचा पुरावा हा सामंजस्य करार व नमुद केलेल्या दिवशी महिना------- आणि वर्ष ----------या रोजी केला आहे.

| | | |
|---|---|---|
| सही | सही | सही |
| **(नाव------------------)** | **(नाव------------------)** | **(नाव------------------)** |
| **अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी** | **प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** | **प्रकल्प संचालक प्रकल्प कार्यान्वीन अभिकरण** |

www.mahaagri.gov.in

# कामाचे वेळापत्रक

| बाब | | विहीत कालावधी | जबाबदारी |
|---|---|---|---|
| १ | राज्याचा यथार्थदर्शी आराखडा (SPP) व प्राथमिक अहवाल तयार करणे (PPR) | ३ महिने | राज्य स्तर – (SPP)<br>जिल्हा पाणलोट विकास युनिट - (PPR) |
| २ | निधी वितरण | १ महिने | भु संसाधन विभाग |
| ३ | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणाची नेमणुक | १५ दिवस | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| ४ | प्रकल्पास मंजुरी देणे व भु-संसाधन विभागास कळविणे. | २ महिने | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| ५ | पह्लिया हप्त्याचे वितरण | १ महिने | भु संसाधन विभाग |
| ६ | प्रकायं ला पह्लिया हप्त्याचे वितरण | १५ दिवस | जिल्हा पाणलोट विकास युनिट |
| ७ | पाणलोट विकास पथकाची स्थापना | १५ दिवस | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा |
| ८ | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. | ३ महिने | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा |
| ९ | सविस्तर प्रकल्प अहवाल जिल्हा पाणलोट विकास युनिट्ला सादर करणे. | १ आठवडा | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा |
| १० | सविस्तर प्रकल्प अहवालाचे मुल्यमापन | ३ आठवडे | जिल्हा पाणलोट विकास युनिट |
| ११ | सविस्तर प्रकल्प अहवाल जिल्हा नियोजन समितीला सादर करणे. व मंजुरी घेणे | ३ आठवडे | जिल्हा पाणलोट विकास युनिट |
| १२ | सविस्तर प्रकल्प अहवाल वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेला सादर करणे. | १ आठवडा | जिल्हा पाणलोट विकास युनिट |
| १३ | सविस्तर प्रकल्प अहवालास भु-संसाधन विभागाचे अधिका-याचे उपस्थित मान्यता देणे. | १ महिना | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| १४ | सविस्तर प्रकल्प अहवालानुसार वार्षिक कृती आराखडा तयार करुन वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेला सादर करणे. | २ महिने | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा |
| १५ | वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देवुन भु-संसाधन विभागास सादर करणे. | १ महिना | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| १६ | वार्षिक कृती आराखड्यास भु-संसाधन विभागाकडुन मान्यता | १ महिना | भु संसाधन विभाग |
| १७ | दिलेल्या उद्दिष्टामध्ये मान्यता व संमती दिलेल्या वार्षिक कृती आराखड्यानुसार उद्दिष्टामध्ये सुधारणा करणे. | १ महिना | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| १८ | पह्लिया हप्त्याचा उर्वरित निधीचे वितरण | १ महिना | भु संसाधन विभाग |
| १९ | पह्लिया हप्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व मुल्यमापन अहवाल सादर करणे. | पहिला हप्ता वितरण केल्यापासुन २ वर्षाच्या आत | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| २० | दुस-या हप्त्याचा निधी वितरण | पहिला हप्ता वितरण केल्यापासुन २ वर्षात | भु संसाधन विभाग |
| २१ | दुस-या हप्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व मुल्यमापन अहवाल सादर करणे. | दुसरा हप्ता वितरण केल्यापासुन ३ वर्षाच्या आत | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |
| २२ | तिस-या हप्त्याचा निधी वितरण | दुसरा हप्ता वितरण केल्यापासुन ३ वर्षात | भु संसाधन विभाग |